cmyk

## संपादकीय

### सायबर दरोडेखोरांविरुद्ध राष्ट्रीय लढाईची गरज

देश झपाट्याने डिजिटल होत असताना सायबर गुन्हेगारीही त्याच वेगाने वाढत आहे. सर्वोच्च न्यायालयाने नुकतेच व्यक्त केलेले चिंतन ही केवळ न्यायालयीन टिपणी नसून संपूर्ण व्यवस्था आणि समाजासाठी दिलेला इशारा आहे. सुमारे ५४ हजार कोटी रुपयांची सायबर फसवणूक हा आकडा थरकाप उडवणारा आहे. काही छोट्या राज्यांच्या वार्षिक अर्थसंकल्पाइतकी ही रक्कम आहे.


दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–२८५ | गुरूवार दि.१२ फेब्रुवारी २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये


# आता जमिनीसाठी एन.ए.परवानगीची गरज नाही

## जमीन महसूल कायद्यात मोठा बदल, जमीन मालकांना दिलासा

पुणे । प्रतिनिधी

**राज्याच्या जमीन महसूल कायद्यात मोठा बदल करण्यात आला आहे. आता बिगर कृषी वापरासाठी जिल्हाधिकाऱ्यांकडून स्वतंत्र परवानगी घेण्याची आवश्यकता संपली असून, एन.ए. (नॉन–अग्रीकल्चरल) परवानगी घेण्याची सुद्धा गरज राहणार नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनंतर महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी जमीन महसूल कायद्यात मोठा बदल केला आहे.**

जमीन महसूल कायद्यात मोठे बदल करण्यात आले आहेत. आता अकृषक कर आकारला जाण्याची सोय पूर्णपणे रद्द करण्यात आली आहे. जमीन मालकांना फक्त एकरकमी 'रुपांतरण अधिमूल्य' भरावे लागेल. या रकमेच्या भरपाईनंतर जमीन अकृषक वापरासाठी रूपांतरित केली जाऊ शकते. याशिवाय, सनद घेण्याची गरज देखील संपली आहे. बांधकाम आराखडा मंजुरी मिळाल्यास त्यालाच एन.ए. मानले जाईल. यामुळे जमीन रूपांतर



प्रक्रिया जलद, सोपी आणि पारदर्शक होईल. यापूर्वी अकृषक वापरासाठी जिल्हाधिकाऱ्यांकडून स्वतंत्र परवानगी घेणे आवश्यक होते. तसेच एन.ए. मंजुरीसाठीही अनेक कागदपत्रांचा भार सहन करावा लागत असे. मात्र, महसूल विभागाने तयार केलेल्या नवीन कार्यपद्धतीनुसार आता बांधकाम आराखडा मंजुरी म्हणजेच एन.ए. मानली जाईल. यामुळे जमीन रूपांतर प्रक्रियेत महत्त्वाची सोपी सुधारणा झाली आहे. महसूल विभागासाठी ही कार्यपद्धती लागू झाली असून, राजपत्रात देखील ती प्रकाशित करण्यात आली आहे. या निर्णयामुळे जमीन रूपांतर प्रक्रियेत महत्त्वाची सुलभता येईल, त्याचबरोबर अकृषक कराचा त्रासही संपेल. शासनाच्या या निर्णयामुळे महसूल विभागाच्या कार्यपद्धतीत पारदर्शकता येईल, तसेच जमीन मालकांना वेळ वाचवून त्यांचा प्रशासनाचा ▶▶ पान २ वर

# राष्ट्रवादीबाबत दिल्लीत खलबतं

## सुनेत्राताईंची आधी मोदी अन् नंतर अमित शहासोबत बैठक

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी बुधवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली. मंगळवारी रात्री उशिरा दिल्लीत दाखल झाल्यानंतर सुनेत्रा पवार यांनी सकाळी राष्ट्रवादीचे कार्यकारी अध्यक्ष प्रफुल्ल पटेल यांची भेट घेत चर्चा केली. त्यानंतर सुनेत्रा पवार यांच्यासह पार्थ पवार, जय पवार, सुनील तटकरे आणि स्वत: प्रफुल्ल पटेल यांनीही आधी पंतप्रधान मोदी आणि नंतर अमित शाह यांची भेट घेतली.**



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सोमवारी रात्री उशिरा दिल्लीत येऊन भाजप नेतृत्वाची भेट घेऊन नंतर ते मुंबईला परतल्याची माहिती समोर आली होती. या सर्व घडामोडी, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती मृत्यूनंतर राज्यातील राजकीय परिस्थिती आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांचे विलीनीकरण या दृष्टीने एकत्रितपणे जोडून पाहिल्या जात आहेत. सध्या राज्यसभेच्या खासदारही असलेल्या पवार मध्यंतरी घडलेल्या घडामोडीनंतर प्रथमच दिल्लीत गेल्या आहेत. सुनेत्रा पवार यांच्यासह त्यांच्या दोन्ही पुत्रांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेत जवळपास ४० मिनिटे त्यांच्यासोबत चर्चा केली. तसेच नंतर अमित शाह यांच्यासोबतही अर्धा तास चर्चा केली. यावेळी राष्ट्रवादीच्या विलीनीकरणावर चर्चा ▶▶ पान २ वर



# केंद्रीय पथक बीड जिल्ह्यात

बीड । प्रतिनिधी

अतिवृष्टीमुळे २०२५ च्या पावसाळ्यात राज्यातील विविध जिल्ह्यांत झालेल्या नुकसानीचा सविस्तर आढावा घेण्यासाठी पोस्ट डिसास्टर नीड्स अस्सेसमेंट आपत्तीपश्चात गरजांचे मूल्यांकनपथक राज्यात दाखल झाले आहे . या पार्श्वभूमीवर केंद्राच्या राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणातील तज्ज्ञांचे पथक बीडसह मराठवाड्यातील प्रभावित जिल्ह्यांना भेट देत आहेत . पथकात पुढील अधिकारी आहेत . श्री. एम. विनोथ , सौ. वंदना श्रीवास्तव , श्री. सुहास मोहंती , श्री. रोहित कुमार व सौ. वैशाली मस्के.

राज्याच्या महसूल व वन विभाग, मदत व पुनर्वसन विभागाने ९ फेब्रुवारी २०२६ रोजी यासंदर्भात पत्र जारी केले असून, या पथकाचा दौरा १० ते १३ फेब्रुवारीदरम्यान आयोजित करण्यात आला आहे . पावसाळ्यात ▶▶ पान २ वर

# विमान दुर्घटनेत घातपात

## पिंकी माळी हिच्या वडिलांचाही आरोप

पुणे । प्रतिनिधी

बारामती येथील विमान अपघातात मृत्युमुखी पडलेली फ्लाईट अटेंडन्ट पिंकी माळी हिच्या वडिलांनी या घटनेवर गंभीर संशय व्यक्त केला आहे. हा अपघात नसून घातपात असल्याचा दावा करताना त्यांनी सांगितले की, प्रवासापूर्वी केवळ पायलटच नव्हे तर विमानही ऐनवेळी बदलण्यात आले होते. यापूर्वी अजित पवारांनी नेहमी काळ्या व करड्या रंगाच्या विमानातून प्रवास केला होता, मात्र अपघाताच्या दिवशी त्यांना पांढऱ्या रंगाचे विमान का दिले, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. सकाळी ६ वाजता मुंबईत वाहतूक कोंडीमुळे पायलट ▶▶ पान २ वर

# १२ वीच्या परीक्षेत कॉप्यांचा सुळसुळाट

## शिक्षणमंत्री संतापले, आता केंद्र प्रमुख अन् पर्यवेक्षकांवर कारवाई

नाशिक । प्रतिनिधी

राज्यात १२ वी बोर्ड परीक्षेला १० फेब्रुवारीपासून सुरुवात झाली असून राज्य सरकारच्या कॉपीमुक्त अभियानास पहिल्याच दिवशी हरताळ फासण्यात आल्याचे पाहायला मिळाले. विशेष म्हणजे, परीक्षा केंद्रावरील अधिकारी आणि पर्यवेक्षक विद्यार्थ्यांना कॉपी पुरवत असल्याचे सीसीटीव्हीत कैद झाले असून, पालकांकडून संताप व्यक्त होत आहे. याप्रकरणी, वरिष्ठ अधिकाऱ्यांनी कारवाईचे निर्देश दिले



असताना आता, शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनीही संबंधित केंद्रांची

# बीडमध्ये पोलीस भरतीवेळी धावताना तरूणाचा मृत्यू

बीड । प्रतिनिधी

जिल्हा पोलीस दलाच्या १७४ पदांसाठी सुरू झालेल्या भरती प्रक्रियेच्या पहिल्याच दिवशी बुधवारी एक अत्यंत धक्कादायक आणि दुर्दैवी घटना घडली आहे. परळी येथील दीपक भास्कर वाव्हळ वय (२६) या तरुणाचा मैदानी चाचणीदरम्यान मृत्यू झाला. यामुळे संपूर्ण जिल्ह्यात हळहळ व्यक्त केली जात आहे.



बुधवारी पहाटे ५ वाजेपासून पोलीस मुख्यालयाच्या मैदानावर भरती प्रक्रियेला सुरुवात झाली होती. दुपारी १२:३० च्या सुमारास १६०० मीटर धावण्याची चाचणी पूर्ण केल्यानंतर दीपकला अचानक चक्कर आली आणि तो जमिनीवर कोसळला. उपस्थित पोलिसांनी त्याला तातडीने जिल्हा रुग्णालयात दाखल केले, परंतु डॉक्टरांनी त्याला तपासून मृत घोषित केले. कडक ऊन आणि उकाड्यामुळे हृदयविकाराचा झटका आल्याचा प्राथमिक अंदाज वर्तवण्यात आला आहे. राज्यात सध्या उन्हाचा तडाखा वाढत असताना, दुपारी १२ वाजेपर्यंत शारीरिक चाचण्या घेतल्या जात असल्याबद्दल तीव्र संताप व्यक्त होत आहे. ग्रामीण भागातून आलेले उमेदवार अनेकदा उपाशीपोटी चाचणी देतात, त्यात उन्हामुळे त्यांच्या शरीरावर ताण येतो. अशा दुर्दैवी घटना टाळण्यासाठी प्रशासनाने सकाळी ९ वाजेच्या आत सर्व मैदानी ▶▶ पान २ वर

# आठव्या वेतन आयोगाची अंमलबजावणी लांबणार!

दिल्ली । वृत्तसंस्था

आठव्या वेतन आयोगा संदर्भात अर्थ मंत्रालयाने लिखित उत्तरात स्पष्ट केले की, आठवा वेतन आयोग लागू करण्यासाठी कमिशन गठीत करण्यात आलेले आहे. याची अधिसूचना ३ नोव्हेंबर २०२५ रोजी काढण्यात आलेली होती. आयोगाकडून निश्चित केलेल्या वेळेत काम पूर्ण होईल आणि शिफारशी सादर केल्या जातील. दरम्यान, आपल्या विविध मागण्यांसाठी कर्मचारी संघटनेने गुरूवारी एक दिवसाचा संप जाहीर केला आहे. ▶▶ पान २ वर

# राहुल गांधींविरोधात विशेषाधिकार भंगाची नोटीस – किरेन रिजिजू

दिल्ली । वृत्तसंस्था

केंद्रीय अर्थसंकल्प २०२६–२७ वरील चर्चेदरम्यान विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींवर केलेल्या गंभीर आरोपांमुळे राजकीय वातावरण तापले आहे. संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू यांनी तीव्र संताप ▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### शिक्षकाने छडी वापरणे हा गुन्हा नाही–हायकोर्ट

तिरूअनंतपूरमः शाळेत विद्यार्थ्यांना शिस्त लावणे आणि त्यांच्या वर्तणुकीत सुधारणा करणे हे शिक्षकांचे कर्तव्य आहे. आई–वडील आपल्या मुलांना शाळेत प्रवेश देतात तेव्हा अप्रत्यक्षपणे शिक्षकांना पाल्याच्या हितासाठी आवश्यक तो अधिकार बहाल करत असतात. शिस्त लावण्यासाठी चांगल्या हेतूने दिलेली शारीरिक शिक्षा हा गुन्हा ठरत नाही. विद्यार्थ्यांना शिस्त लावण्यासाठी शिक्षकाने छडीचा वापर करणे गुन्हा नव्हे, असा महत्त्वपूर्ण निर्वाळा देत उच्च न्यायालयाने शिक्षकाविरुद्धची फौजदारी कारवाई रद्द करण्याचा निर्णय दिला. विद्यार्थ्यांच्या हितासाठीच शिक्षा करणे हे शिक्षकाच्या अधिकारकक्षेत येते, असेही यावेळी स्पष्ट केले. केरळमधील वेंगलूर येथील ३६ वर्षीय शिक्षकावर स्टाफ रूममध्ये विद्यार्थ्याला नितंबांवर काठीने मारहाण केल्याचा आरोप होता. याप्रकरणी शिक्षकावर भारतीय न्याय संहिता आणि बाल न्याय कायद्याच्या कलमांनुसार गुन्हा नोंदवण्यात आला होता.

### वांगचुक प्रकरणी न्यायालयाचे ताशेरे

नवी दिल्लीः लडाखमधील प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांना राष्ट्रीय सुरक्षा कायद्यांतर्गत ताब्यात घेण्याच्या केंद्र सरकारच्या निर्णयावर सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी (दि.११) तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त केली. सरकार वांगचुक यांच्या विधानांचा अतिरेकी अर्थ लावत असल्याचे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले. दरम्यान वांगचुक यांची सध्यातरी सुटका करता येणार नाही, अशी स्पष्ट भूमिका केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात मांडली. गेल्या वर्षी लेहमध्ये झालेल्या हिंसक आंदोलनाप्रकरणी वांगचुक यांना राष्ट्रीय सुरक्षा कायद्यांतर्गत ताब्यात घेण्यात आले आहे. या आंदोलनात चार जणांचा मृत्यू झाला होता, तर १५० हून अधिक जण जखमी झाले होते. वांगचुक यांच्या पत्नी गीतांजली अंगमो यांनी दाखल केलेल्या याचिकेवर न्यायमूर्ती अरविंद कुमार आणि न्यायमूर्ती पी. बी. वराळे यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली.

### पहिल्याच दिवशी भाजप–ठाकरे सेना आमने–सामने

मुंबईः मुंबई महापालिकेत भाजप–एकनाथ शिंदे शिवसेना युतीने महापौर–उपमहापौरपदाचा पदभार स्वीकारला. या वेळी भाजप–शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे नगरसेवक आमने–सामने आल्याने गोंधळ उडाला. भाजप नगरसेवकांनी 'मोदी–मोदी'च्या घोषणा देताच, ठाकरे सेनेच्या नगरसेवकांनी 'चोर है चोर है'च्या घोषणा दिल्या. पुढे 'देवाभाऊ–देवाभाऊ' नावाच्या घोषणा सुरू होताच, ठाकरे सेनेच्या नगरसेवकांनी 'ठाकरे–ठाकरे', अशी जोरदार घोषणाबाजी केली. या घोषणाबाजीने मुंबई महापालिकेच्या सभागृहातील वातावरण चांगलेच तापले. मुंबई महापालिकेच्या इतिहासात पहिल्यांदाच पालिकेची सत्ता भाजपने हस्तगत केली. रितू तावडे यांनी पदभार स्वीकारला. मुंबई महापालिकेतील प्रशासक राजवट संपुष्टात आली. मात्र, सत्तारोहणाच्या पहिल्याच दिवशी भाजप आणि ठाकरे सेनेच्या नगरसेवकांमध्ये जोरदार खडाजंगी झाली.

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती,**

बीड, दि.११ फेब्रुवारी २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
| --- | --- | --- | --- |
| गहू: २१.०० क्विंटल | २,२५० | २,६३० | २,३९७ |
| ज्वारी/हायब्रिड: ५४.५० क्विंटल | १,७९० | ४,३०० | ३,१८९ |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : ९४.०० क्विंटल | ७,६०० | ७,९२० | ७,७९६ |
| उडीद : ७.०० क्विंटल | ४,८०० | ५,७०० | ५,२५० |
| बाजरी: १५.५० क्विंटल | २,५०१ | ३,२५१ | २,८०४ |
| मुग: २.०० क्विंटल | ५,९०० | ५,९०० | ५,९०० |
| सोयाबीन: ५४.०० क्विंटल | ५,३७० | ५,३८० | ५,३७३ |
| हरभरा: ६.०० क्विंटल | ४,८५१ | ४,८५१ | ४,८५१ |

# आता राष्ट्रगिताच्या आगोदव वाजणार वंदे मातरम्!

## ३ मिनिटे १० सेकंदांच्या गीतादरम्यान उभे राहणेही बंधनकारक; नवीन नियम लागू

दिल्ली । वृत्तसंस्था

**केंद्र सरकारने ''वंदे मातरम्'' बाबत नवीन मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत. गृह मंत्रालयाच्या आदेशानुसार, ''वंदे मातरम्'' आता सरकारी कार्यक्रम, सरकारी शाळेतील कार्यक्रम आणि इतर औपचारिक मेळाव्यांमध्ये वाजवले जाईल. या काळात सर्वांनी आदराने उभे राहणे बंधनकारक असेल. जर वंदे मातरम आणि राष्ट्रगीत एकाच वेळी गायले किंवा वाजवले गेले तर प्रथम वंदे मातरम् वाजवले जाईल. राष्ट्रीय भावनेचा स्पष्ट संदेश देण्यासाठी यावेळी लक्षपूर्वक उभे राहणे आवश्यक असेल, असे निर्देश जारी करण्यात आले आहेत.**




नवीन नियमांनुसार, सहा परिच्छेद असलेले वंदे मातरम्चे पूर्ण रूप आता ३ मिनिटे आणि १० मिनिटांसाठी वाजवले जाईल. त्यात दुर्गासह तीन हिंदू देवींचा उल्लेख आहे. आतापर्यंत, मूळ वंदे मातरम् गाण्याच्या सहा परिच्छेदांपैकी फक्त पहिले दोनच गायले जात होते. राष्ट्रध्वज फडकवणे, राष्ट्रपतींचे कार्यक्रमांमध्ये आगमन, राष्ट्राला उद्देशून भाषणे देण्यापूर्वी आणि नंतर, राज्यपालांचे आगमन आणि भाषणे देण्यापूर्वी आणि नंतर अशा अनेक अधिकृत प्रसंगी वंदे मातरम् वाजवणे अनिवार्य करण्यात आले आहे. केंद्र सरकारने मार्गदर्शक तत्त्वे जारी केली. १० पानांच्या आदेशात, सरकारने असेही म्हटले आहे की, पद्म पुरस्कार सोहळ्यासारख्या नागरी पुरस्कार समारंभात किंवा राष्ट्रपती उपस्थित असलेल्या कोणत्याही कार्यक्रमात वंदे मातरम् वाजवले जाईल. ▶▶ पान २ वर

### मागच्या अधिवेशनादरम्यान झाला होता वाद...

गेल्या वर्षी, केंद्र सरकारने संसदेच्या हिवाळी अधिवेशनात वंदे मातरमच्या १५० व्या वर्धापन दिनानिमित्त विशेष चर्चा आयोजित केली होती. या मुद्द्यावरून लोकसभा, राज्यसभेत गदारोळ झाला. पश्चिम बंगालमधील निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सरकार राष्ट्रगीताचा वापर करत असल्याचा आरोप काँग्रेसने केला. भाजपने काँग्रेसवर तुष्टीकरणाच्या राजकारणाचा भाग म्हणून वंदे मातरमचे काही भाग कापल्याचा आरोप केला.

# मुखेड तालुक्यात भूकंपाचे सौम्य धक्के

नांदेड । प्रतिनिधी

**तालुक्यातील हिब्बट, कोळगाव, धामणगाव, मोटरगा, धनज व जामखेड या गावांमधून बुधवारी ११ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी ०३:२५ मी. वाजता भूगर्भातून आवाज येऊन जमीन हादरली. राष्ट्रीय भूकंप विज्ञान केंद्राच्या संकेतस्थळावर तपासले असता धक्क्याची नोंद झाली असून या धक्क्याची तीव्रता रिश्टर स्केलवर ३.० एवढी नोंदविण्यात आली. याचा केंद्रबिंदु नांदेड जिल्ह्यातील मुखेड तालुक्यातील खपराळ गावाजवळ असल्याचे कळते.**

सदर धक्का हा अतिसौम्य प्रकारचा आहे तसेच या धक्क्यामुळे कुठलीही जीवित व वित्त हानी झाली नसल्याबाबत तहसीलदार मुखेड यांनी जिल्हा आपत्कालीन कार्यकेंद्रास कळविले आहे. नागरिकांनी घाबरून न जाता सतर्क रहावे. तसेच गावात ज्या लोकांच्या घराचे छत पत्र्याचे आहे व त्यांनी पत्र्यावर आधारासाठी दगड ठेवले आहेत त्यांनी सुरक्षिततेचा भाग ▶▶ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# सायबर दरोडेखोरांविरुद्ध राष्ट्रीय लढाईची गरज

देश झपाट्याने डिजिटल होत असताना सायबर गुन्हेगारीही त्याच वेगाने वाढत आहे. सर्वोच्च न्यायालयाने नुकतेच व्यक्त केलेले चिंतन ही केवळ न्यायालयीन टिपणी नसून संपूर्ण व्यवस्था आणि समाजासाठी दिलेला इशारा आहे. सुमारे ५४ हजार कोटी रुपयांची सायबर फसवणूक हा आकडा थरकाप उडवणारा आहे. काही छोट्या राज्यांच्या वार्षिक अर्थसंकल्पाइतकी ही रक्कम आहे. हा केवळ आर्थिक तोटा नाही, तर सामान्य नागरिकांच्या विश्वासावर झालेला हल्ला आहे.

हरियाणातील एका वृद्ध जोडप्याला ''डिजिटल अटक'' दाखवून लुटण्यात आलेली घटना ही सध्याच्या संकटाचे प्रतीक आहे. पोलीस किंवा न्यायालयातील अधिकारी असल्याचे भासवून भीती निर्माण केली जाते आणि काही मिनिटांत आयुष्यभराची कमाई साफ होते. विशेषतः ज्येष्ठ नागरिक, गृहिणी, तंत्रज्ञानाशी कमी परिचित असलेले लोक हे या टोळ्यांचे प्रमुख लक्ष्य ठरत आहेत. आर्थिक नुकसान तर होतेच; पण त्याहून गंभीर म्हणजे मानसिक खच आणि सामाजिक लाजिरवाणेपणा यामुळे अनेक कुटुंबे उद्ध्वस्त होतात.

सर्वोच्च न्यायालयाने या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारला तातडीने मार्गदर्शक तत्त्वे तयार करण्याचे निर्देश दिले आहेत. आरबीआय, बँका आणि दूरसंचार विभागाने एकत्रितपणे नुकसानभरपाईचा आराखडा तयार करावा, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. काही प्रकरणे सीबीआयकडे सोपवण्यात आली आहेत आणि आंतरराष्ट्रीय टोळ्यांचा सहभाग लक्षात घेऊन इंटरपोलची मदत घेण्याचाही सल्ला देण्यात आला आहे. यावरून या समस्येची व्याप्ती स्थानिक नसून राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय आहे, हे स्पष्ट होते.

सायबर गुन्हेगारीचे स्वरूप अत्यंत बहुरूपी आहे. फिशिंग, बनावट गुंतवणूक योजना, डिजिटल पेमेंट ॲप्समधील फसवणूक, केवायसी अपडेटच्या नावाखाली पैसे उकळणे, सोशल मीडियावर बनावट प्रोफाइल तयार करून विश्वास संपादन करणेअशा असंख्य मार्गांनी लूट चालते. तंत्रज्ञान जसे प्रगत होते, तसे गुन्हेगारही अधिक हुशार होत आहेत. त्यामुळेच डिजिटल सुरक्षितता ही एकदाच राबवायची मोहीम नसून सतत अद्ययावत राहणारी प्रक्रिया आहे.

सरकारकडून अपेक्षित उपाययोजना स्पष्ट आहेत. राज्यपातळीवर विशेष सायबर पोलीस ठाण्यांची संख्या वाढवणे, तांत्रिक तज्ज्ञांची नियुक्ती करणे, बँका आणि दूरसंचार कंपन्यांमध्ये रिअल-टाईम समन्वय यंत्रणा उभारणे, संशयास्पद व्यवहार तात्काळ रोखण्याची प्रणाली मजबूत करणे आणि गुन्हेगारांना जलद व कठोर शिक्षा देणे ही किमान पावले आहेत. त्याचबरोबर शालेय आणि महाविद्यालयीन स्तरावर डिजिटल साक्षरता अभ्यासक्रमात समाविष्ट करणे ही काळाची गरज आहे. परंतु या सर्व उपायांइतकीच महत्त्वाची आहे ती नागरिकांची वैयक्तिक जबाबदारी. इंटरनेटच्या सुविधा वापरताना जागरूकता न बाळगता केवळ सरकारकडून संरक्षणाची अपेक्षा ठेवणे व्यवहार्य नाही. तज्ज्ञांनी दिलेले सोपे कानमंत्र ओटीपी, बँक खात्याचा तपशील किंवा वैयक्तिक माहिती कोणालाही देऊ नका; अनोळखी लिंकवर क्लिक करू नका; भीती दाखवून तातडीची कारवाई करण्यास भाग पाडणाऱ्या कॉल्सपासून सावध राहा; कोणतीही सरकारी संस्था फोनवरून गोपनीय माहिती मागत नाही हे नियम पाळणे अत्यावश्यक आहे.

तितकेच महत्त्वाचे म्हणजे फसवणूक झाल्यास तक्रार तात्काळ नोंदवणे. अनेकांना तक्रार कुठे आणि कशी करायची हेच माहीत नसते. वेळेवर दिलेली माहिती आणि तत्पर कारवाईमुळे किमान काही रक्कम गोठवता येऊ शकते. पण विलंब केल्यास पैसे परदेशी खात्यांमध्ये वळवले जातात आणि त्यांची परतफेड म्हणजे अडथळ्यांची शर्यत ठरते. आज डिजिटल व्यवहार ही केवळ सोय नसून जीवनाचा अविभाज्य भाग झाली आहे. सरकारने मजबूत धोरणे आखणे, संस्थात्मक समन्वय वाढवणे आणि कडक कायदे लागू करणे आवश्यक आहेच; पण त्याच वेळी समाजानेही डिजिटल शहाणपण स्वीकारले पाहिजे. ''मला काही होणार नाही'' हा निष्काळजी दृष्टिकोन सोडून सावधगिरीचा संस्कार रुजवणे ही काळाची मागणी आहे. सायबर दरोडेखोरांविरुद्धची ही लढाई एकट्या सरकारची नाही, ती प्रत्येक नागरिकाची आहे. विश्वास, सुरक्षितता आणि आर्थिक स्थैर्य टिकवण्यासाठी राष्ट्रीय पातळीवर ठोस कृती आणि वैयक्तिक पातळीवर सजगता या दोन्हींचा संगम झाला तरच डिजिटल भारत खऱ्या अर्थाने सुरक्षित बनेल.

# कदीम जालना पोलिसांचे हुकूमशाही पत्रकाराला धमकी अद्याप गुन्हा दाखल नाही

जालना । प्रतिनिधी

**लोकशाहीचा चौथा स्तंभ असलेल्या पत्रकारितेवर थेट हल्ला झाल्याची धक्कादायक घटना जालना जिल्हा परिषद कार्यालयात घडली. बातमीच्या अनुषंगाने माहिती घेत असताना एका गुत्तेदाराने पत्रकारास अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करत धक्काबुक्की व जीवे मारण्याची धमकी देण्यात आली होती. या संदर्भात सोमवार (दि.२) रोजी संपादक भरत मानकर यांनी रितसर तक्रार कदीम जालना पोलीस ठाणे येथे पोलीस निरीक्षक जर्नाधन शेवाळे यांची भेट घेऊन दिली होती. या तक्रारीला दहा दिवस होत आले असून अद्याप पर्यंत पोलीसांनी एफआयआर दाखल केला नसल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. कदीम जालना पोलीस स्टेशन हुकुमशाही प्रमाणे सुरू असल्याचे दिसून येत आहे याप्रकरणी पोलीस अधीक्षक यांनी तात्काळ चौकशी करून गुन्हा दाखल करण्याचे आदेश देणे अशी मागणी पत्रकाराच्या वतीने करण्यात येत आहे. कदीम जालना पोलीसांना गुन्हा दाखल करण्यास विलंब होत आहे की, जाणूनबुजून विलंब करण्यात येत आहे असा प्रश्न निर्माण झाला आहे. महत्त्वाचे म्हणजे ज्या श्री बांगड विरोधात तक्रार दाखल करण्यात आली आहे. त्या श्री बांगड विरोधात अंबड पोलीस ठाण्यात यापुर्वी पत्रकारांला धमकावल्याबाबत तक्रार देण्यात आली होती. त्यावेळीही पोलीसांनी प्रकरण मिटवून घेण्यावर भर दिला होता.**

यासंदर्भात अधिक माहिती अशी की, सोमवार, दि. २ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी १ ते १.३० वाजेच्या सुमारास संपादक भरत गणपतराव मानकर हे जिल्हा परिषद बांधकाम विभागातील सहाय्यक लेखाधिकारी श्री. हारुण यांच्या कॅबिनमध्ये एका बातमीच्या संदर्भात माहिती घेत बसले होते. त्यावेळी श्री. बांगड नावाचा गुत्तेदार अचानक तेथे आला. प्रत्यक्षदर्शींच्या माहितीनुसार, संबंधित गुत्तेदाराने अत्यंत गलिच्छ, अश्लील व अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करत, ''कोण मादर.. पत्रकार आहे हा आमचे बिल रोखण्याचा प्रयत्न करतो त्याचे हातपाय तोडून टाकू याला लय मस्ती आली आहे'' अशा धमकीवजा शब्दांचा वापर केला. इतकेच नव्हे तर पत्रकार मानकर यांना प्रत्यक्ष धक्काबुक्की करत कार्यालयातून हाकलून देण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. या घटनेमागे केवळ वैयक्तिक राग नसून, बांधकाम विभागातील कामांच्या चौकशीची भीती होती. पत्रकार मानकर हे संबंधित गुत्तेदाराच्या कामांबाबत माहिती घेत होते, त्यामुळे संभाव्य अनियमितता उघडकीस येण्याच्या भीतीनेच ही धक्काबुक्की व जीवे मारण्याची धमकी करण्यात आल्याचा संशय व्यक्त होत होता. यासोबतच, पत्रकार कार्यालयात आल्याची तसेच कोणत्या कामाबाबत चौकशी करत आहेत, याची माहिती गुत्तेदारास नेमकी कोणत्या कर्मचारी अथवा अधिकाऱ्याने दिली, याची सखोल चौकशी होणे अत्यावश्यक असल्याची मागणी करण्यात आली होती.

# शनिवारी मुख्यमंत्री परळीत

## बीडसह राज्यातील पशू पालकांनी प्रदर्शनाचा लाभ घेण्याचे केले आवाहन

परळी वै.। प्रतिनिधी

**प्रभू वैद्यनाथाच्या नगरीत राज्याच्या पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या पुढाकाराने ऐतिहासिक व भव्य असे राष्ट्रीय स्तरावरील महापशुधन एक्स्पो पहिल्यांदाच भरत आहे. या पशू प्रदर्शनाचे उद्घाटन शुक्रवारी ना. पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते होत आहे. दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे शनिवार १४ तारखेला परळीत येणार आहेत.**

शहरातील वैद्यनाथ महाविद्यालयाच्या समोरील ओपळे मैदानात पशुसंवर्धन विभागाच्या वतीने १३ ते १५ फेब्रुवारी दरम्यान 'अखिल भारतीय पशुपक्षी प्रदर्शनाचे' भव्य आयोजन करण्यात आले आहे. या प्रदर्शनामध्ये देशभरातील विविध प्रजातींचे एक हजाराहून अधिक पशू सहभागी होणार असून प्रदर्शनाच्या जय्यत तयारीला सध्या वेग आला आहे. शुक्रवारी १३ तारखेला सकाळी ११ वा. प्रदर्शनाचे उद्घाटन ना. पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते व मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे निमंत्रण पत्रिकेनुसार प्रदर्शनाच्या समारोपाला म्हणजे रविवारी १५ तारखेला येणार होते परंतु ते आता शनिवार १४ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वा. शहरात येणार आहेत. मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रदर्शनात पशुपालकांना गायी, म्हशी, घोडे, शेळ्या-मेंढ्या आणि विविध पक्ष्यांच्या दर्जेदार प्रजाती पाहायला मिळणार आहेत. केवळ महाराष्ट्रच नव्हे, तर संपूर्ण देशातील प्रगतशील पशुपालक व शेतकरी या ठिकाणी हजेरी लावणार आहेत. पशुपालकांना आधुनिक पशुपालन, आहार व्यवस्थापन आणि आरोग्याविषयी सविस्तर माहिती या माध्यमातून मिळणार आहे. राज्याच्या पशुसंवर्धन विभागाच्या वतीने ना.पंकजाताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली या प्रदर्शनाचे नियोजन अत्यंत प्रभावीपणे करण्यात येत आहे. परळी वैजनाथ येथे प्रदर्शनासाठी भव्य मैदान व पशुधनासाठी आवश्यक सुविधा उभारण्याचे काम सध्या अंतिम टप्प्यात आले आहे. महाशिवरात्र आणि महा पशुधन एक्सपो हा अत्यंत सुंदर योगायोग आहे. या खात्याची मंत्री म्हणून परळीत असे प्रदर्शन व्हावे अशी माझी इच्छा होती. नवीन तंत्रज्ञान व दर्जेदार पशुधनाची माहिती घेण्यासाठी हे प्रदर्शन एक महत्त्वपूर्ण व्यासपीठ ठरणार आहे. बीड जिल्ह्यासह राज्यातील जास्तीत जास्त पशुपालकांनी या तीन दिवसीय प्रदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन ना. पंकजाताई यांनी केले आहे.



# जिल्हाधिकारी यांच्या आदेशावरून वाळूमाफियावर आरटीओ पथकाची कारवाई

जालना । प्रतिनिधी

आता जालना जिल्ह्यामध्ये आरटीओ विभाग करणार वाळू माफेवर कारवाई ११ फेब्रुवारी २०२६ रोजी जिल्हाधिकारी मा.अशिमा मित्तल यांच्या निर्देशानुसार तसेच उपप्रादेशिक परिवहन अधिकारी श्री. चंद्रमोहन चिंतल यांच्या मार्गदर्शनाखाली, उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, जालना यांच्या वायुवेग पथकाने अवैध गौण खनिज वाहतुकीविरुद्ध विशेष तपासणी मोहीम राबविली. ही कारवाई पथकाचे नियंत्रक अधिकारी मोटार वाहन निरीक्षक श्री. भीमराज नागरे यांच्या सोबत पथकातील कर्मचारी अधिकाऱ्यांनी कारवाई केली.


मंठा जाफराबाद टेंभुर्णी परिसरात करण्यात आलेल्या तपासणीत सहा वाहनांवर मोटार वाहन कायद्यानुसार दंडात्मक कारवाई करण्यात आली असून एकूण सुमारे रुपये १,५०,०००/- इतका दंड आकारण्यात आला आहे. तसेच विनापरवाना वाळू वाहतूक करणारे एक वाहन जप्त करून ते टेंभुर्णी पोलीस स्टेशन येथे जमा करण्यात आले आहे. तपासणीदरम्यान विनानंबर प्लेट टिप्पर व विनापरवाना वाळू वाहतूक करणारी वाहने आढळून आली. संबंधित वाहनांवर नियमानुसार कारवाई करण्यात आली आहे. या मोहिमेत मोटार वाहन निरीक्षक श्री. निलेश अहिरे, श्री. शुभम मोटे व श्री. अक्षय पाटील , सहा मोटर वाहन निरीक्षक श्रीमती सोळुंके यांनी सहभाग नोंदविला. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी श्री. चंद्रमोहन चिंतल यांनी अवैध वाहतुकीविरुद्ध महसूल विभाग, पोलीस विभाग व परिवहन विभागाची संयुक्त कारवाई यापुढेही सातत्याने सुरू राहील, असा इशारा दिला आहे.

# शालेय उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्याचे काम शाळेने केले-सागर धस

आष्टी । प्रतिनिधी

ग्रामीण भागात दर्जेदार शिक्षणाची संकल्पना रुजविण्याचे स्वप्न पाहणारे वडील सुरेश अण्णा धस व आई प्राजक्ता धस यांच्या दूरदृष्टीतून अनिशा ग्लोबल स्कूलची स्थापना झाली.आष्टीसारख्या ठिकाणी आधुनिक व गुणवत्तापूर्ण शिक्षण देणारी शाळा उभी करण्याचा त्यांचा निर्धार आज प्रत्यक्षात उतरलेला दिसतो. स्थापनेपासून आजपर्यंत त्यांनी स्वतः वेळ देत, प्रत्येक बाबीकडे बारकाईने लक्ष ठेवत शाळेची धुरा समर्थपणे सांभाळली.शैक्षणिक गुणवत्तेसोबतच सांस्कृतिक, क्रीडा व इतर सहशालेय उपक्रमांमध्येही विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्याचे काम त्यांनी केले. प्रत्येक विद्यार्थी आणि पालकांशी सुसंवाद ठेवत विश्वासाचे नाते निर्माण करण्यात शाळा देखील यशस्वी ठरली असून.या प्रवासात सर्व शिक्षकवृंद, पालकवर्ग तसेच पिंपळेश्वर देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष व सर्व संचालक यांचा मोलाचा हातभार लाभला असल्याचे मत सागर धस यांनी व्यक्त केले.ते अनिशा ग्लोबल स्कूलच्या वार्षिक स्नेहसंमेलन उद्घाटन प्रसंगी बोलत होते.

यावेळी संस्थेच्या मार्गदर्शका प्राजक्ताताई धस,युवा नेते जयदत्त धस,ऐश्वर्या धस,ट्रस्टी लक्ष्मण रेडेकर,थोरले महाराज,संजय मुळे उगले मॅडम,सुखलाल मुथा,शाळेचे प्राचार्य अविनाश राऊत, तपन गौडा,क्षितिजा रामदासी आदी तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी,पालक,नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी



हा सोहळा मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात पार पडला. विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी सजलेल्या या सोहळ्यात विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांचे प्रभावी दर्शन घडवून उपस्थित पालक व मान्यवरांची मने जिंकली. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व सरस्वती पूजनाने करण्यात आली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध नृत्य, नाट्य व गीतांनी वातावरण भारावून गेले. विशेष आकर्षण ठरले ते छत्रपती संभाजी महाराज आणि कवी कलश यांच्या जीवनावर आधारित नाट्यप्रयोगाचे. संभाजी महाराजांना बंदी केल्यानंतर त्यांच्यावर करण्यात आलेल्या अमानुष अत्याचारांचे आणि त्यांच्या निर्दयी हत्येचे दृश्य विद्यार्थ्यांनी अत्यंत प्रभावीपणे साकारले. या प्रसंगाने उपस्थितांच्या अंगावर अक्षरशः शहारे आले. विद्यार्थ्यांच्या अभिनयकौशल्यामुळे अनेकांच्या डोळ्यांत अश्रू तरळले आणि काही काळ स्तब्धता पसरली. याचबरोबर भक्त प्रल्हाद आणि भगवान विष्णूंच्या नृसिंह अवतारावर आधारित गीत-नाट्य सादरीकरणाने धार्मिक आणि सांस्कृतिक मूल्यांची जाणीव करून दिली. लहानग्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या या कार्यक्रमाला विशेष दाद मिळाली. इयत्ता पहिलीपासून ते दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी विविध देशभक्तीपर, पारंपरिक तसेच आधुनिक गीतांवर सादर केलेल्या नृत्याविष्कारांनी कार्यक्रमाची रंगत वाढवली. आकर्षक वेशभूषा, नेटक्या हालचाली आणि आत्मविश्वासपूर्ण सादरीकरणामुळे प्रत्येक कार्यक्रमाला टाळ्यांचा कडकडाट लाभला. यावेळी शाळेचे प्राचार्य अविनाश राऊत यांनी आपल्या प्रास्ताविकात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले.पालकांनीही शाळेच्या उपक्रमांचे कौतुक करत विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव दिल्याबद्दल समाधान व्यक्त केले.एकूणच, अनिशा ग्लोबल स्कूलच्या वार्षिक स्नेहसंमेलनाने विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या कला, आत्मविश्वास आणि संस्कारांचे सुंदर दर्शन घडवले. हा सोहळा उपस्थितांच्या स्मरणात दीर्घकाळ राहील, अशी भावना अनेकांनी व्यक्त केली.




## पान १ वरून...

### आता जमिनीसाठी

त्रास कमी होईल. या बदलामुळे आता जमीन मालकांना एन.ए. मिळवण्यासाठी अनेक महिने किंवा वर्षे वेटिंग करत बसण्याची गरज राहणार नाही, तर फक्त 'रुपांतरण अधिमूल्य' भरून ते आपली जमीन अकृषक वापरासाठी रूपांतरित करू शकतील.

-----------

### केंद्रीय पथक बीड

झालेल्या हानी-नुकसानीचा सखोल अभ्यास करून त्याचा अहवाल केंद्र सरकारकडे सादर केला जाणार आहे. या अहवालाच्या आधारे राज्याला केंद्राकडून भरपाई निधी मिळण्यास मदत होणार असल्याचे नमूद करण्यात आले आहे. या पथकाचे दोन उपगट करण्यात आले आहेत. यापैकी एक उपगट सोलापूर व धाराशिव जिल्ह्यांची पाहणी करणार असून दुसरा उपगट छत्रपती संभाजीनगर, बीड व अहिल्यानगर या जिल्ह्यांना भेट देणार आहे. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी सूचित केल्यानुसार व निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली नियोजन करण्यात आले . बीड जिल्ह्यातील बाधित भागांची प्रत्यक्ष पाहणी ११ फेब्रुवारी रोजी करण्यात आली . आधी केंद्रीय पथकाने यावेळी गेवराई तालुक्यातील खामगाव , राक्षस भुवन , धोंडराई , गेवराई , हिरापूर , ईटकुर या ठिकाणी भेटी दिल्या . संपूर्ण दौऱ्याच्या दरम्यान उपविभागीय अधिकारी कविता जाधव, तहसीलदार संदीप खोमणे , गटविकास अधिकारी अनिरुद्ध सानप , तालुका कृषी अधिकारी श्री गिरी सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता रवींद्र तोंडे , पाटबंधारे विभागाचे अधिकारी , नायब तहसीलदार संजय सोनवणे , पोलीस उपनिरीक्षक जयराज उबाळे व विविध विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यानंतर पथकाने बीड तालुक्यातील नांदूर हवेली येथील सिंदफणा नदीच्या काठालगत खरडून गेलेल्या जमिनीची आणि काळाने भरलेल्या विहिरी यांची पाहणी केली . यावेळी बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके , गावचे सरपंच शाहेद पटेल व अनेक गावकरी उपस्थित होते . यावेळी तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी पथकास सविस्तर माहिती दिली . केंद्रीय पथकाने शिरुर मधील प्रमाणात ब्रह्मनाथ येळंब या गावात भेट दिली व तालुक्यातील विविध अधिकारी यांच्यासोबत आपत्ती विषयक चर्चा केली व माहिती घेतली. या पाहणीनंतर तयार होणारा पीडीएनए अहवाल केंद्र सरकारकडे पाठविण्यात येणार असून, त्याच्या आधारे शेती, पायाभूत सुविधा, घरे, रस्ते आदी क्षेत्रांतील नुकसानीसाठी केंद्राकडून आर्थिक मदत मिळण्याची अपेक्षा आहे.

------------

### राष्ट्रवादीबाबत दिल्लीत

झाल्याचे सांगितले जात आहे. कारण मागील काही दिवसांपासून पवार कुटुंबात बैठकांचा सिलसिला सुरू होता. त्यानंतर आता सुनेत्रा पवार यांनी भाजप नेतृत्वाची भेट घेतल्याने राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाबाबत आगामी काही दिवसांत नेमक्या काय घडामोडी घडतात, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. सुनेत्रा पवार यांनी मंगळवारी पदाचा कार्यभार स्वीकारला. यावेळी सुनेत्रा पवार व त्यांचे पुत्र पार्थ यांना अश्रू अनावर झाले होते. उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतल्यानंतर सुनेत्रा पवार पहिल्यांदाच दिल्लीला गेल्या. त्याच्या सोबत पक्षाचे पदाधिकारी देखील होते, मात्र राज्यात विलीनीकरणाची चर्चा, विमान अपघाताची चर्चा यावरून या भेटीत बरेच खलबतं सुरु असल्याची राज्यात चर्चा आहे.

-----------

### बीडमध्ये पोलीस भरतीवेळी

चाचण्या पूर्ण कराव्यात, अशी मागणी आता जोर धरत आहे. आपल्याला पोलीसच व्हायचे या ध्येयाने प्रेरित होऊन दिपकने मोठ्या आशेने पोलीस भरतीची तयारी केली होती. गेल्या अनेक वर्षांपासून सुरू असलेली तयारी त्याला एक दिवस नक्कीच यशापर्यंत पोहचवेल असा विश्वास त्याला होता. मात्र त्याचवेळी नियतीने त्याच्यावर झडप घातली आणि त्याचे पोलीस व्हायचे स्वप्न अधुरे राहिले. पोलीस भरती प्रक्रियेच्या पहिल्याच दिवशी अशी दुर्दैवी घटना घडल्याने बीड जिल्ह्यासह राज्यभर मोठी हळहळ व्यक्त केली जात आहे.

---------

### १२ वीच्या परीक्षेत कॉप्यांचा

मान्यता रद्द करण्यात येईल, तसेच पर्यवेक्षक आणि केंद्र अधिकाऱ्यांवर कारवाई केली जाईल, असे स्पष्ट केले आहे. परीक्षा केंद्रातील शाळांना सीसीटीव्ही लावणे इतर सुविधा, पाणी, बसेस वेळेवर पोहचल्या पाहिजे यांसह सर्वच निर्देश दिले होते. तरीही १२ वी परीक्षांत कॉपीच्या घटना घडल्याचे दिसले. त्यामुळे, कॉपीच्या घटना समोर आलेल्या केंद्रावर रद्द बातलची कारवाई केली जाईल, यापुढे परवानगी दिली जाणार नाही. कॉपी करणाऱ्यांसह केंद्र प्रमुख आणि पालकांवरही कारवाई केली जाईल. ज्या शाळांनी पालन केले नाही, त्यांच्यावर कारवाई केली जाईल अशी माहिती शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी दिली. कॉपीमुक्त परीक्षा अभियान राबविले जात आहे. त्यामध्ये शिक्षण विभागाची जबाबदारी आहे. महसूल विभाग, गृह, ग्रामविकास विभागाचे सहकार्य घेतले जाते, आढावा बैठक घेतली जाते. मात्र, जिथं कॉपीचे प्रकार घडले तिथे कारवाई करण्यात येईल, असे दादा भुसेंनी स्पष्ट केले. दरम्यान, मराठवाड्यातील काही जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात कॉपी प्रकरणे पुढे आली आहेत. परीक्षा केंद्रावरील सिसीटिव्ही फुटेज आणि उत्तरपत्रिकांच्या झेरॉक्स प्रतींच्या आधारे तब्बल १९ पर्यवेक्षक आणि केंद्रसंचालकांवर कठोर कारवाई प्रस्तावित करण्यात आली आहे. या घटनेमुळे शिक्षण क्षेत्रात एकच खळबळ उडाली आहे.

----------

### विमान दुर्घटनेत घातपात

पोहोचला नाही हा दावाही त्यांनी फेटाळून लावला. दुसरीकडे, आमदार रोहित पवार यांनीही विमानातील तांत्रिक बिघाड आणि सर्किट ब्रेकरमध्ये छेडछाड झाल्याचा संशय व्यक्त करत मुख्य पायलटच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. या दाव्यांमुळे राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

------------

### राहुल गांधींविरोधात विशेषाधिकार

व्यक्त केला असून, राहुल गांधींविरोधात विशेषाधिकार भंगाची नोटीस दाखल करणार असल्याचे त्यांनी जाहीर केले. देशाला विकण्याची हिंमत असणारा कोणीही जन्माला आलेला नाही, अशा शब्दांत रिजिजू यांनी गांधींना प्रत्युत्तर दिले. दरम्यान, भाजप खासदार अनुराग ठाकूर यांनीही राहुल गांधींवर टीकास्त्र सोडताना हा अर्थसंकल्प 'सर्वजन हिताय' असल्याचे म्हटले असून काँग्रेसच्या काळातच अर्थव्यवस्थेचे नुकसान झाल्याचा पलटवार केला.

---------

### आठव्या वेतन आयोगाची

आठव्या वेतन आयोगाच्या अंमलबजावणीकडे सरकारी कर्मचारी डोळे लाऊन बसले आहेत. याचसंदर्भात एक महत्त्वाची अपडेट समोर येत आहे. राज्यसभेत विचारण्यात आलेल्या एका प्रश्नाला सरकारने लेखी उत्तर दिले आहे. केंद्रीय अर्थ राज्यमंत्री पंकज चौधरी यांनी राज्यसभेत माहिती दिली की, केंद्र सरकार आठव्या वेतन आयोगानुसार सरकारी कर्मचारी आणि निवृत्तीवेतनधारकांच्या वेतन, भत्ते आणि पेन्शनची समीक्षा करेल. आयोगाला दिलेल्या वेळेमध्येच शिफारशी सरकारला मिळतील. दरम्यान, आयोगाला आपल्या शिफारशी सादर करण्यासाठी १८ महिन्यांचा वेळ देण्यात आलेला आहे. त्यामुळे २०२७ मध्ये या शिफारशी सरकारला मिळतील, हे स्पष्ट आहे. त्यानंतर सरकारच्या वतीने पुढील कार्यवाही केली जाईल. तो वेळ किती असेल, याबाबत मात्र कुठलीही स्पष्टता नाही. आठवा वेतन आयोग लागू झाल्यानंतर सरकारच्या तिजोरीवर किती ताण पडेल, याबाबत सभागृहात विचारण्यात आले होते. मात्र सरकारडून याबाबत अंदाज लावणे अवघड असल्याचे सांगितले गेले.

**कर्मचारी संघटनांचा आज संप**

कन्फेडरेशन ऑफ सेंट्रल गव्हर्नमेंट एम्प्लॉईज अँड वर्कर्सने १२ फेब्रुवारी २०२६ रोजी देशभरात एक दिवसाच्या संपाची घोषणा केली आहे. संघटनांच्या प्रमुख मागण्यांमध्ये २० टक्के अंतरिम सवलत, ५० टक्के महागाई भत्त्याला मूळ वेतनात जोडणे आणि जुनी पेन्शन योजना लागू करणे, या मुद्द्यांचा समावेश आहे. या मागण्यांसाठी कर्मचारी संघटना रस्त्यावर उतरणार आहेत.

-----------

### मुखेड तालुक्यात

म्हणून त्वरित दगड काढून घ्यावेत व पत्रे बोल्ट ने फिट करून घ्यावीत. पुन्हा असा आवाज आलाच तर पटकन घराबाहेर मोकळ्या जागेत गोळा व्हावे व प्रशासनाला (०२४६२) २३५०७७ या क्रमांकावर संपर्क करून कळवावे तसेच कोणत्याही अफवांनावर विश्वास ठेवू नये, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी जनतेला केले आहे.

-------------

### आता राष्ट्रगिताच्या आगोदव

तथापि, सिनेमागृहांना नवीन नियमांमधून सूट देण्यात आली आहे. याचा अर्थ असा की चित्रपटगृहांमध्ये वंदे मातरम् वाजवणे आणि चित्रपट सुरू होण्यापूर्वी उभे राहणे अनिवार्य राहणार नाही. वंदे मातरम्बद्दल स्पष्ट मार्गदर्शन करण्यासाठी नवीन सूचना देण्यात आल्या आहेत. वंदे मातरम् ७ नोव्हेंबर १८७५ रोजी अक्षय नवमीच्या शुभ प्रसंगी बंकिम चंद्र चॅटर्जी यांनी लिहिले होते. ते पहिल्यांदा १८८२ मध्ये त्यांच्या बंगदर्शन मासिकात त्यांच्या आनंदमठ या कादंबरीचा भाग म्हणून प्रकाशित झाले होते. १८९६ मध्ये, रवींद्रनाथ टागोर यांनी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनात व्यासपीठावर वंदे मातरम् गायले. राष्ट्रीय स्तरावर हे गाणे सार्वजनिकरित्या गायले जाण्याची ही पहिलीच वेळ होती. मेळाव्यात उपस्थित असलेल्या हजारो लोकांना यावेळी अश्रू अनावर झाले. वंदे मातरम् हा संस्कृत वाक्यांश आहे ज्याचा अर्थ आहे, हे आई, मी तुला नमन करतो. स्वातंत्र्यलढ्यादरम्यान, वंदे मातरम हा भारताला वसाहतवादी राजवटीपासून मुक्त करण्यासाठी लढणाऱ्या स्वातंत्र्यसैनिकांचा नारा बनले होते.

-------------

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
गुरुवार दि. १२ फेब्रुवारी २०२६


## थोडक्यात



### त्याग संघर्ष आणि समतेची प्रेरणा माता रमाई –विजय साळवे

माजलगाव । प्रतिनिधी

येथील सम्राट अशोक नगरमध्ये माता रमाबाई भिमराव आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात व थाटामाटात साजरी करण्यात आली. जयंतीदिनी त्यागमुर्ति माता रमाई यांच्या प्रतिमेचे पूजन करून बुद्ध वंदनेने कार्यक्रमाची सुरुवात केली व त्यांच्या सामाजिक कार्याची व त्यागमय जिवनाची आठवण करून देत मान्यवरांनी उपस्थितांना प्रेरणादायी संदेश दिला.

सामाजीक कार्यक्रमात सदैव अग्रेसर राहून काम करणारे सम्राट अशोक नगर डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती समितीचे अध्यक्ष सन्नी भाऊ प्रधान उपाध्यक्ष रोहीत साळवे सचिव अजय साळवे यांनी आयोजीत केलेल्या या अद्वितीय रमाई जयंती उत्सवास प्रमुख उपस्थितीत असलेले रिपब्लिकन सेना बीड जिल्हा अध्यक्ष विजय दादा साळवे यांनी रमाबाई भिमराव आंबेडकर यांची जिवन गाथा मांडत असतांना सांगीतले की त्याग संघर्ष आणि समतेची प्रेरणा म्हणजे माता रमाई होय. प्रसंगी माजलगाव शहर पोलिस ठाण्याचे पो. उपनिरीक्षक राठोड साहेब यांनीही उपस्थितांना संबोधित केले. कार्यक्रमा दरम्यान ४ ते १२ वयोगटातील मुला मुलींच्या विवीध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले असता उत्साही वातावरणात झालेल्या या कार्यक्रमात एकोप्याची भावना आणि सामाजीक जागृतीचे दर्शन घडले. या प्रेरणादायी कार्यक्रमाच्या निमित्ताने घेण्यात आलेला स्पर्धेमध्ये विजयी स्पर्धकांना स्वप्निल ज्वेलर्स यांच्या वतीनं बक्षिस देण्यात आले.या कार्यक्रमाला पोलिस कर्मचारी गवळी साहेब , ज्ञानोबा भोजणे , ॲड नंदकिशोर खळगे, प्रशांत जाधव सर , पत्रकार रविंद्र राऊत , पत्रकार अमर साळवे , विक्की मराठे , आकाश शिंदे , अनिल भराटे यांच्या सह सम्राट अशोक नगर येथील माता भगीनी लहाण थोर मंडळी आणि यशोधरा महिला मंडळाच्या सर्व पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पि आर पी नेते सिद्धार्थ ससाणे यांनी केले तर अमोल चांदमारे यांनी आभार मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशाल जाधव , संग्राम गायकवाड , अभिषेक चौरे , सिद्धु सुरवसे , विराज आठवे , रितेश मिसाळ , आकाश आठवे , सुमित मोरे , ऋतिक सिरसाट आदिंनी परिश्रम घेतले.

### महा पशुसंवर्धन शिबिरास उपस्थित रहा – डॉ. संजय नाकलगावकर

माजलगाव । प्रतिनिधी



माजलगाव तालुक्यातील सर्व शेतकरी,पशुपालकांना अखिल भारतीय महा पशुसवर्धन शिबीरास उपस्थित राहण्याचे आवाहन पशुवैद्यकीय डॉ संजय नाकलगावकर यांनी केले आहे.हे शिबिर केवळ एक कार्यक्रम नसून पशुपालकांसाठी ज्ञानाची मोठी शिदोरी ठरणार आहे. या संदर्भात डॉ. नाकलगावकर यांनी सांगितले आहे, शेतकरी, पशुपालक यांना

आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख: पशुपालन व्यवसायात होत असलेले नवीन बदल आणि आधुनिक तंत्रज्ञान प्रत्यक्ष पाहण्याची ही मोठी संधी आहे.तज्ज्ञांचे मार्गदर्शन: शिबिरात नामवंत पशुवैद्यक आणि तज्ज्ञ उपस्थित राहणार आहेत. त्यांच्याकडून जनावरांचे आरोग्य, आहार आणि व्यवस्थापन यावर मोलाचे मार्गदर्शन मिळेल. शासकीय योजनांची माहिती: पशुसंवर्धन विभागाच्या विविध योजना, अनुदाने आणि विमा योजनांची माहिती एकाच छताखाली मिळणार आहे.व्याधी निवारण आणि उपचार: जनावरांच्या विविध आजारांवर वेळीच उपाय कसे करावेत, याचे प्रात्यक्षिक ज्ञान येथे उपलब्ध होईल.''पशुपालन हा केवळ जोडधंदा नसून तो आपल्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा आहे. हा व्यवसाय अधिक फायदेशीर आणि सुलभ करण्यासाठी विज्ञानाची जोड देणे आवश्यक आहे. परळी येथे होणाऱ्या या महा शिबिराचा लाभ प्रत्येक पशुपालकाने घ्यावा, जेणेकरून आपले पशुधन सुरक्षित आणि आरोग्यदायी राहील.आपल्या सर्व मित्र-परिवारासह आणि पशुपालक बांधवांसह या शिबिरास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आव्हान डॉ संजय नाकलगावकर यांनी केले आहे !

# युरिया खताची साठेबाजी, लिंकिंग व जादा दराने विक्री करणाऱ्यांवर कठोर कारवाई

पाटोदा । प्रतिनिधी

जिल्ह्यात युरिया खताची साठेबाजी, जादा दराने विक्री, लिंकिंग तसेच बोगस खत विक्री करणाऱ्या कृषी निविष्ठा विक्री केंद्रांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचा स्पष्ट इशारा कृषी विभागाने दिला आहे. शेतकऱ्यांनी खत खरेदी करताना पावती घेणे बंधनकारक असून, कोणतीही अनियमितता आढळल्यास तात्काळ तक्रार नोंदवावी, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयाच्या वतीने करण्यात आले आहे.

जिल्ह्यात युरिया व इतर रासायनिक खतांची मोठ्या प्रमाणावर मागणी असताना काही विक्रेत्यांकडून शेतकऱ्यांची आर्थिक पिळवणूक होत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. या पार्श्वभूमीवर कृषी विभागाने जिल्ह्यातील कृषी निविष्ठा विक्री केंद्रांची सखोल तपासणी मोहीम राबवली. या तपासणीत आढळून आलेल्या विविध त्रुटींमुळे ५२ कृषी निविष्ठा विक्री केंद्रांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. तसेच बोगस खत विक्री करणाऱ्या दोन कृषी निविष्ठा विक्री केंद्रांवर व संबंधित कंपनीवर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले असल्याची माहिती कृषी विभागाने दिली आहे.

शेतकऱ्यांच्या सोयीसाठी कृषी विभागामार्फत शेतकऱ्यांना आपल्या मोबाईलमध्ये 'कृषक प' डाउनलोड करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या पच्या माध्यमातून युरिया व इतर खते कोणत्या कृषी निविष्ठा विक्री केंद्रावर उपलब्ध आहेत, याची माहिती शेतकऱ्यांना सहजपणे मिळू शकणार आहे.

तसेच जिल्ह्यातील सर्व कृषी निविष्ठा विक्री केंद्रांना स्पष्ट सूचना देण्यात आल्या असून, अनुदानित खताची विक्री केवळ ई-पॉस मशीनद्वारेच करणे बंधनकारक करण्यात आले आहे. ई-पॉस मशीनशिवाय खत विक्री केल्याचे आढळून आल्यास संबंधित विक्री केंद्रावर तात्काळ कारवाई करण्यात येईल, असा इशाराही कृषी विभागाने दिला आहे.

शेतकऱ्यांच्या तक्रारींची तात्काळ दखल घेण्यासाठी जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात तालुका गुणवत्ता नियंत्रण निरीक्षकांचे संपर्क क्रमांक जाहीर करण्यात आले आहेत. युरिया खताची साठेबाजी, जादा दर, लिंकिंग किंवा बोगस खत विक्रीबाबत अडचण आल्यास शेतकऱ्यांनी थेट संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

कृषी विभाग शेतकऱ्यांच्या हितासाठी पूर्णपणे कटिबद्ध असून, युरिया खताची जादा दराने विक्री, लिंकिंग करून विक्री किंवा बोगस खत विक्री करणाऱ्या कृषी निविष्ठा विक्री केंद्रांवर कोणतीही तडजोड न करता कठोर कारवाई करण्यात येईल, असे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी एस. एम. साळवे यांनी स्पष्ट केले आहे.

#### तालुका निहाय संपर्क क्रमांक

बीड – श्री. भाऊसाहेब तुकाराम सोनवणे : ९६०४१९०७७३
पाटोदा – श्री. पवार कल्याण साहेबराव : ९४२२५२१४६४
शिरूर (का.) – श्री. गर्जे नारायण भगवान : ९४२२१६२८४०
आष्टी – श्री. शिंदे नागसेन छत्रगुण : ७०६६८५१८५२
माजलगाव – श्री. मुनगिलवार विजय औदुंबर : ९४२१६६०३५४
धारूर – श्री. दहिफळे यशवंत बळीराम : ८८३०७११७१५
गेवराई – श्री. हिरे गणेश भरत : ८८०५२७५९८५
वडवणी – श्री. बांगर सुभाष काशीनाथ : ९४२२६१८२००
आंबाजोगाई – श्री. ढाकणे सुरेश कोंडीबा : ८३२९९६८९५५
परळी – श्रीमती. तिडके स्वाती संजीवन : ८७८८३७६३४९
केज – श्री. मुंडे पवन शिरीषकुमार : ९८३४२८८३०१

#### शेतकऱ्यांनी तात्काळ तक्रार करावी – कृषी विभागाचे आवाहन

## धारूर आगार एसटी कामगार संघटनेच्या अध्यक्षपदी डी.बी. मुंडे तर सचिवपदी जगदीश थोरात यांची निवड

किल्ले धारूर । प्रतिनिधी

मान्यता प्राप्त महाराष्ट्र एसटी कामगार संघटनेच्या किल्ले धारूर आगार कार्यकारिणीची सन २०२६-२७ या कालावधीसाठी निवड प्रक्रिया तांबवेश्वर लॉन्स, किल्ले धारूर (केज रोड) येथे उत्साहात पार पडली. या निवड बैठकीत डी.बी. मुंडे यांची अध्यक्षपदी तर जगदीश थोरात यांची सचिवपदी बहुमताने निवड करण्यात आली.

या महत्त्वपूर्ण बैठकीच्या सुरुवातीला आगारातील चालक व संघटनेचे सभासद कै. आत्मलिंग गुजर यांच्या दुःखद निधनाबद्दल उपस्थित सर्व पदाधिकारी व सभासदांच्या वतीने भावपूर्ण आदरांजली अर्पण करण्यात आली. या शोकांतिकेमुळे बैठकीत कोणत्याही प्रकारचे हार-तुरे अथवा सत्कार स्वीकारण्यात आले नाहीत. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संघटनेचे ज्येष्ठ मार्गदर्शक विलासदादा शिंदे होते. प्रमुख उपस्थिती म्हणून विभागीय सचिव गणेश (बापू) चव्हाण, विभागीय अध्यक्ष ज्ञानेश्वर चातुर, संघटक सचिव वल्लभ जिजा चिरके तसेच सहसचिव विजय कुडके हे उपस्थित होते. आगारातील विविध विभागांतील मोठ्या संख्येने सभासदांनी बैठकीला हजेरी लावली होती. बैठकीत संघटनेच्या मागील कार्यकाळाचा आढावा घेण्यात आला. त्यानंतर नव्या कार्यकारिणीची निवड प्रक्रिया पार पडली. या प्रक्रियेत किल्ले धारूर आगाराची कार्यकारिणी





बहुमताने निवडण्यात येत अध्यक्षपदी डी.बी. मुंडे व सचिवपदी जगदीश थोरात यांची अधिकृत घोषणा करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन संघटनेचे ज्येष्ठ मार्गदर्शक अशोकभाऊ मुळे यांनी केले. तर बैठकीचे यशस्वी आयोजन शरददादा चाटे यांनी केले होते.यावेळी नवनिर्वाचित अध्यक्ष डी.बी. मुंडे यांनी सन २०२५ मधील संघटनेच्या कामकाजाचा सविस्तर लेखाजोखा सभासदांसमोर मांडला. कामगारांच्या विविध प्रश्नांवर संघटनेने केलेल्या प्रयत्नांची माहिती देत पुढील काळात संघटना अधिक सक्षम व प्रभावी करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

निवडीनंतर बोलताना विभागीय सचिव गणेश (बापू) चव्हाण यांनी संघटनेचे महत्त्व विशद करत कामगारांनी संघटनेच्या माध्यमातून एकत्र राहावे, असे आवाहन केले. तसेच सचिन नन्नवरे यांना लवकरच विभागीय कार्यकारिणीत पद देऊन योग्य मानसन्मान दिला जाईल, असे आश्वासनही त्यांनी दिले.विभागीय अध्यक्ष ज्ञानेश्वर चातुर यांनी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करत सर्वांनी एकोप्याने व समन्वयाने काम करण्याचे आवाहन केले.

संपूर्ण बैठक शिस्तबद्ध, खेळीमेळीच्या व संवेदनशील वातावरणात पार पडली. संघटनेतील एकजूट व शिस्त याचे दर्शन या निवड प्रक्रियेतून घडल्याची भावना सभासदांनी व्यक्त केली. कार्यक्रमाच्या शेवटी नामदेव तिडके यांनी आभार प्रदर्शन केले.

## धनंजय मुंडेंच्या पाठपुराव्याला यश

### जिल्ह्यात आणखी ११ वसतिगृहे उभारणीस शासनाकडून निधी उपलब्ध!

मुंबई । प्रतिनिधी

लोकनेते स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाच्या अंतर्गत तत्कालीन सामाजिक न्याय मंत्री धनंजय मुंडे यांनी सुरू केलेल्या संत भगवान बाबा शासकीय वसतीगृह योजनेला व्यापक स्वरूप प्राप्त होत असून धनंजय मुंडे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला मोठे यश आले आहे.



धनंजय मुंडे यांनी सामाजिक न्याय मंत्री असताना २५ जून, २०२१ रोजी या योजनेची घोषणा करून प्रत्यक्षात अंमलबजावणी सुरू केली होती. त्यामुळे मुंडे जनक असलेल्या संत भगवान बाबा शासकीय वसतीगृह योजनेच्या माध्यमातून बीड जिल्ह्यातील सर्व ११ तालुक्यांमध्ये शंभर क्षमतेचे मुलींसाठी एक व मुलांसाठी एक असे एकूण २२ वसतीगृह मंजूर करून भाड्याच्या जागेत सुरू करण्यात आलेले आहेत. दरम्यान त्यापैकी आतापर्यंत तीन वसतीगृहांना स्वतःची जागा व निधी मिळालेला असून त्याचे बांधकाम प्रगतीपथावर असून, उर्वरित १९ पैकी ११ वसतीगृहांसाठी जागेसह १५९ कोटी छत्तीस लाख रुपयांचा निधी राज्य शासनाने उपलब्ध करून दिला आहे. याबाबतचा शासन निर्णय सामाजिक न्याय विभागाच्या वतीने निर्गमित करण्यात आला आहे.

ऊसतोड कामगारांच्या मुलांच्या हातात भविष्यात कोयत्याच्या ऐवजी वही, पुस्तक आणि पेन यावेत असे स्वप्न उराशी बाळगून धनंजय मुंडे यांनी सामाजिक न्याय मंत्री असताना संत भगवान बाबा शासकीय वसतीगृह योजनेची घोषणा करत सुरुवात केली होती. त्या अंतर्गत ऊसतोड कामगारांची सर्वाधिक संख्या असलेल्या राज्यातील ४१ तालुक्यांमध्ये ८२ वसतीग्रह सुरू करण्याची घोषणा धनंजय मुंडे यांनी करून बीड जिल्ह्यातील सर्व ११ तालुक्यांमध्ये प्रत्येकी दोन याप्रमाणे २२ वसतीग्रहे भाड्याच्या जागेत सुरू केली होती.

## स्व. पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या पुण्यतिथी निमित्त माजलगाव भाजपाच्या वतीने अभिवादन

माजलगांव । प्रतिनिधी

भारतीय जनता पार्टीच्या वतीने ''समर्पण दिन'' निमित्त व स्व. पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या पुण्यतिथी निमित्त त्यांच्या प्रतिमेला पुष्पमाला अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक शहर मंडळ अध्यक्ष विनायक रत्नपारखी यांनी केले.या प्रसंगी पंडित दिनदयाल उपाध्याय यांच्या आठवणीला उजळा देत व त्यांनी केलेल्या कार्याची मांडणी करताना भाजपा शहर सरचिटणीस पवन मोगरेकर म्हणाले अखंड मानवतावादाची विचारसरणी आणि अंत्योदयाची संकल्पना मांडणारे पंडित दीनदयाळ उपाध्याय यांनी अविरतपणे समर्पण भावनेने केलेल्या कार्याची माहिती आपल्या मनोगतातून सांगितली.ते याप्रसंगी म्हणाले एकात्म मानव दर्शन या संकल्पनेतून त्यांनी समाज,राष्ट्र आणि माणूस केंद्रस्थानी ठेवणारा विचार देशासमोर मांडला. राजकारण हे सत्तेसाठी नसून सेवेचे माध्यम असावे , समाजातील शेवटच्या घटकाचा



विकास हाच खरा विकास आहे हा त्यांचा मूलमंत्र होता,त्यांचे विचार साधे जीवन आणि प्रखर राष्ट्रनिष्ठा आजही आपल्या सर्वांना प्रेरणा देतात असे सांगितले

या कार्यक्रमाला भाजपाचे ज्येष्ठ नेते ज्ञानेश्वर मेंडके, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती नितीन नाईकनवरे,माजी नगराध्यक्ष दिपक मुंडे,भाजप नेते प्रताप रांजवण, माजलगाव शहर मंडळाध्यक्ष विनायक रत्नपारखी,भाजप पात्रुड मंडळ अध्यक्ष डॉ. अभिजीत सोळंके , अभय होके पाटील,शरदराव कचरे,भाजपा सरचिटणीस कैलास खुरपे,भाजपा उपाध्यक्ष बाळासाहेब क्षिरसागर, भाजपा उपाध्यक्ष कल्याण शेप , भाजपा चिटणीस विनोद लड्डा, भाजपा उपाध्यक्ष रामेश्वर चव्हाण, भाजपा विस्तारक रमेश शेंडगे, भाजपा चिटणीस संतोष जाधव, भाजपा शहर चिटणीस सुभाष कांबळे, शहरचिटणीस मनोज कोरडे, भाजपा सरचिटणीस पवन मोगरेकर, नारायणराव मेंडके,युवा नेते संतोषराव सोळंके,रवी गायकवाड,ओंकार गिरी गोविंद जांगिड,बबलू राऊत,किशोर विभुते यांच्यासह शक्ती प्रमुख बूथ प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते.

## पान ६ वरुन...

### नाला प्रकरणावरून धारूर

आणि आपल्या मागणीसाठी थेट आत्महत्येचा प्रयत्न केला. यावेळी उपस्थित असलेल्या कर्मचारी आणि नागरिकांची मोठी धावपळ उडाली. कर्तव्यावर असलेल्या महसूल अधिकारी व पोलिसांनी तत्काळ भालेकर यांना ताब्यात घेऊन त्यांना समजावून सांगितले.

परिस्थितीचे गांभीर्य ओळखून तहसील प्रशासनाने तात्काळ सावध भूमिका घेतली. संबंधित सर्वे नंबरमधील नाल्याचा अडथळा दूर करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्याचे आश्वासन प्रशासनाकडून देण्यात आले. ''दिव्यांग बांधवांच्या तक्रारीची दखल घेऊन लवकरच जागेची पाहणी करून योग्य ती कारवाई केली जाईल,'' असे आश्वासन मिळाल्यानंतर भालेकर यांनी आपले आंदोलन मागे घेतले.एका दिव्यांग व्यक्तीला न्याय मिळवण्यासाठी थेट आत्महत्येचा प्रयत्न करावा लागतो, याबद्दल उपस्थित नागरिकांमधून प्रशासनाविरुद्ध संताप व्यक्त केला जात आहे. आता प्रशासन दिलेल्या आश्वासनाची पूर्तता कधी करणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### कर्जतच्या आदर्श पत्रकार

पत्रकार परिषदेचे आदर्श जिल्हा व तालुका पुरस्कार वितरण कर्जत येथे दिनांक २२ फेब्रुवारी रोजी रविवारी रायगड जिल्ह्यातील कर्जत येथे रॉयल गार्डन मध्ये सकाळी ११ वाजता आदर्श जिल्हा व तालुका पत्रकार संघाचे पुरस्कार वितरण होणार आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस. एम. देशमुख सर हे राहणार आहेत. या कार्यक्रमाला संभाजीनगर विभागातील सर्व तालुका आणि जिल्हा पत्रकार संघाने उपस्थित राहावे असे आवाहन जिल्हाध्यक्ष विशाल साळुंके,कार्याध्यक्ष गजानन मुडेगावकर, सरचिटणीस सुभाष सुतार, कोषाध्यक्ष धनंजय अरबुने, प्रसिद्धी प्रमुख संजय हंगे यांनी केले आहे.

### महापशुधन एक्सपोला

विभागाचे माहितीपर स्टॉल्स लावले जाणार आहेत. बचत गटांचेही स्टॉल्स असतील.या महापुशुधन एक्सपो मुळे शेतकरी व पशुपालकांना नव्या तंत्रज्ञानाची माहिती मिळणार आहे. पशुंच्या निगराणी विषयी तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. शेतकरी व पशुपालकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन डोंगरी विकास परिषदेचे जिल्हाध्यक्ष डॉ. संजय तांदळे यांनी केले आहे.

### सौताडा-जामखेड घाटात

बांधकाम विभाग ढिम्म हलण्यास तयार नाही. अर्धवट कामामुळे उडणारी धूळ आणि पावसाळ्यात होणारा चिखल यामुळे अपघातांची तीव्रता अधिकच वाढली आहे. 'कामाचे कंत्राट कोणाला दिले आहे आणि ते पूर्ण का होत नाही?' याबाबत पारदर्शकता नसल्याचा आरोपही आता जनतेतून होत आहे.घाटातील रखडलेले काम तातडीने पूर्ण न झाल्यास आता केवळ निवेदने देऊन थांबणार नाही, तर रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा परिसरातील नागरिकांनी दिला आहे. रस्ता रोको सारखी पावले उचलण्याची तयारी स्थानिक युवकांनी आणि शेतकऱ्यांनी सुरू केली आहे.

### आष्टीच्या प्रथम घोडकेची

प्रथमेश यांच्या निवडीचे वृत्त समजताच राजकीय, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले. मराठवाडा भूषण आमदार सुरेश धस, माजी आमदार भीमराव धोंडे, माजी आमदार साहेबराव दरेकर, माजी आमदार बाळासाहेब आजबे, सरपंच परिषदेचे प्रदेशाध्यक्ष दत्ताभाऊ काकडे, शाहू महाराज शिक्षण संस्थेचे अध्यक्ष सुखदेव पोकळे, नगराध्यक्ष जिया बेग, सभापती बद्रीनाथ जगताप, उपनगराध्यक्ष शैलेश सहस्रबुद्धे, माजी नगराध्यक्ष रंगनाथ धोंडे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती रमजान शेठ तांबोळी यांच्यासह अनेक मान्यवर व मित्रपरिवाराने शुभेच्छा दिल्या.ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी प्रथमेश घोडके यांचे यश प्रेरणादायी ठरले असून, ''प्रत्येक मुलाने आई-वडिलांचे स्वप्न साकार करावे'' या भावनेला त्यांनी खऱ्या अर्थाने न्याय दिला आहे. आष्टीसह संपूर्ण तालुक्यात त्यांच्या यशाचा गौरव केला जात आहे.

### राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाच्या

अधिक व्यापक होत असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. १७५ स्टॉल बुक झाले आहेत. प्रदर्शनामध्ये अजूनही विविध स्टॉलचे बुकिंग सुरू आहे.महाराष्ट्रासह इतर राज्यांमधील कृषी क्षेत्राशी संबंधित उद्योजक व संस्था सहभाग नोंदवत आहेत. प्रदर्शनात विविध पिकांची लागवड पद्धती,सुधारित बियाणे,आधुनिक सिंचन व्यवस्था, ठिबक व तुषार सिंचन,सेंद्रिय शेती, शेती यंत्रसामग्री, पशुपालन, मत्स्यपालन,कृषी प्रक्रिया उद्योग याबाबत सविस्तर माहिती देण्यात येत आहे.अजय वाबळे यांनी सांगितले की, पाणी व्यवस्थापना पासून ते शेतीसाठी लागणाऱ्या आधुनिक साहित्यापर्यंत सर्व विषयांवर शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले जाणार आहे. विविध तज्ज्ञांचे मार्गदर्शनपर व्याख्यान, प्रात्यक्षिके आणि चित्रफितींच्या माध्यमातून शेतकऱ्यांना शेतीतील नवनवीन तंत्रज्ञान समजावून सांगितले जाणार आहे. घरगुती शेती उपाय,सेंद्रिय कीड नियंत्रण,खत व्यवस्थापन यांसारख्या विषयांवरही मार्गदर्शन उपलब्ध आहे.या प्रदर्शनामुळे शेतकऱ्यांना थेट तज्ज्ञांशी संवाद साधण्याची संधी मिळत असून शेतीतील खर्च कमी करून उत्पन्न वाढविण्याचे मार्ग समजणार आहेत. कृषी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनीही या प्रदर्शनाच्या प्रचार-प्रसारात सक्रिय सहभाग घेतला असून शेतकऱ्यांपर्यंत माहिती पोहोचविण्याचे काम प्रभावीपणे पार पाडले आहे.

### आयएसओ जि.प. केंद्रीय

दृष्टीने सर्व वर्गखोल्या व शाळा परिसरात एकूण २७ सीसीटीव्ही कॅमेरे कार्यान्वित करण्यात आले आहेत. सर्व सुविधा उपलब्ध झाल्याने जामगाव येथील आयएसओ जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे एक आदर्श केंद्रबिंदू बनत असल्याचे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.या कार्यक्रमास शाळेचे मुख्याध्यापक नंदकिशोर होगाडे, श्रीम. जयश्री सोळसे, श्रीम. सुजाता पवार, श्रीम. अश्विनी धस, श्रीम. वर्षा गरगडे, श्रीम. शैला सातपुते, शेषराव तोतरे, शरद झेंडे, मिलींद नेटके आदी शिक्षक-शिक्षिका उपस्थित होते. तसेच सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व सदस्य, ज्येष्ठ नागरिक, तरुण मंडळ, शाळेतील शिक्षकवृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल उपस्थित सर्व मान्यवर, ग्रामस्थ व शिक्षकवृंद यांचे आभार शरद झेंडे यांनी मानले.

## परस्त्री आणि परधनाचा त्याग करा जीवनाचा उद्धार होईल

### भगिरथ महाराज काळे महाराज यांचे प्रतिपादन, राजा हरिश्चंद्र महोत्सवाची दिमाखात सुरुवात

वडवणी । प्रतीनिधी

परस्त्री आणि परधनाचा त्याग मानसाने केला तर त्याच्या जीवनाचा उद्धार होईल असे प्रतिपादन महाराष्ट्रातील ख्यातनाम कीर्तनकार ह भ प भगीरथ महाराज काळे (सिन्नर नाशिक) यांनी केले.

भारत देशातील राजा हरिश्चंद्राचे एकमेव तीर्थक्षेत्र बीड जिल्ह्यातील राजा हरिश्चंद्र पिंपरी या तिर्थस्थळावर सोमवार दिनांक ९ फेब्रुवारी पासून महाशिवरात्र महोत्सव मोठ्या थाटामाटात सुरू झाला आहे पहिल्या दिवसाची कीर्तन सेवा ख्यातनाम कीर्तनकार भगीरथ महाराज काळे यांची झाली या कीर्तनासाठी राजा हरिश्चंद्र तीर्थक्षेत्राचे महंत भगवान बाबा राजपूत साल सिद्ध बाबा संस्थानचे मठाधिपती हनुमंत महाराज शास्त्री ख्यातना मृदंगाचार्य भरत महाराज पठाडे गायनाचार्य कातकडे महाराज यांची प्रमुख उपस्थिती होती.

रामनाम कंठात जो पर्यंत येत नाही तो पर्यंत सर्व प्रयत्न व्यर्थच आहेत. त्यामुळे तू सावधान हो सावधान हो सर्व संकल्पनातून मोहाच्या जाळ्यातून मनाची सुटका कर. एखाद्या गोष्टीचा त्याग केला आणि त्याचा पुन्हा स्वीकार केला तर मग यम दंड करतो. जीवन जगत असताना परस्त्री आणि परधनाचा त्याग करा जीवनाचा उद्धार होईल असे ते म्हणाले. आपण ते केले पाहिजे कारण आपण भाग्यवान आहोत. राजा हरिश्चंद्र पिंपरी या तिर्थस्थळावर संत भगवान बाबा यांनी महाशिवरात्र महोत्सवाची सुरुवात केली होती. त्यांचे उत्तराधिकारी संत भिमसिंह बाबा यांनी ही परंपरा आयुष्यभर चालवली. आता भगवान गडाचे महंत नामदेव शास्त्री महाराज यांच्या आधिपत्याखाली या तीर्थ स्थळाचे महंत भगवान बाबा राजपूत यांच्या नेतृत्वाखाली ही परंपरा चालू आहे. आणि मला याठिकाणी आपल्या समोर सेवा करण्याची संधी मिळाली. त्यामुळे मी भाग्यवान आहे. असे उद्गार ह.भ.प. भगीरथ महाराज काळे (सिन्नर) यांनी राजा हरिश्चंद्र महाशिवरात्र महोत्सवाच्या पहिल्या दिवसाच्या हरिकीर्तन प्रसंगी उपस्थित भाविकांना संबोधीत करताना काढले.

संसारातून कुठेतरी थांबलं पाहिजे

ज्या प्रमाणे आपण भोजन करत असताना पांढरा भात सेवन केल्यानंतर पुन्हा कोणताही पदार्थ घेत नाही. तसेच राम प्रभूंचे चरित्र सांगितले जाते यात वाल्मिकी ऋषींनी वर्णन केले की त्या दशरथ महाराजांना डाव्या कानावर एक केस पांढरा दिसला होता. फक्त आणि फक्त त्याच कारणामुळे दशरथ राजानी सांगितले की उद्याच माझा राम राजा होईल अस म्हणत आपले राज्य पुढच्या



पिढीकडे दिले पाहिजे आणि त्यांनी तस केले त्यामुळे आपणही योग्य वेळी संसाररुपी मायातुन बाहेर निघत भगवंताच्या नामात लीन झालं पाहिजे. त्यामुळे आपण नक्कीच समाधानी व्हाल असा संदेश दिला.

मनुष्याने प्रयत्नशील असले पाहिजे

जमिनीत टाकलेले एखाद छोटास बी देखील जमिनीचं पोट फाडून बाहेर येते. आणि ते नऊ दिशांना धावत नाही तर वरच्या म्हणजे आकाशाच्या दिशेने निघते कारण त्यालासुद्धा आपल्या परमात्म्याला पाहण्याची इच्छा असते. आणि ते त्यांच्या शोधात निघते. आपलेही तसेच असले पाहिजे आपण जन्माला आलोत यातच भाग्यवान मानलं पाहिजे आणि जे कार्य करत आहोत त्यातच प्रयतशील राहत भगवंत आहेच ही मनाशी गाठ धरून सतत प्रयत्नशील असले पाहिजे.

सुख मानण्यात आहे

सध्याचा काळात कोणी गरीब असो वा कोणी श्रीमंत असो. मात्र सुखी तोच आहे जो आहे त्या परिस्थितीत सुख मानतो. यामध्ये उदाहरण देताना त्यांनी प्रभू रामचंद्राचे उदाहरण दिलं. प्रभू रामचंद्र उद्या गादीवर बसणार होते मात्र त्यानंतर लगेच त्यांना १४ वर्षाच्या वनवासाला जावं लागलं. मात्र १४ वर्षे वनवासाला जाताना त्यांना किंचितही आपण गादीवर बसणार होतो आणि आज वनवासाला चाललो आहोत याच्यात त्यांना काही बदल झाला नाही. त्यामुळे माणसाने आहे त्या परिस्थितीमध्ये सुख समाधान मानलं तर आयुष्याचे कल्याण नक्कीच होतं. माणसाने आहे त्यात सुख मानने गरजेचे आहे असा मोलाचा संदेशही काळे महाराज यांनी दिला.

मैत्रीचा आदर्श शंभुराजे आणि कवी कलश

छत्रपती संभाजी महाराज आणि कवी कलश यांची मैत्री ही इतिहास, राजकारण आणि अटळ विश्वासाचे एक दुर्मिळ उदाहरण आहे. कवी कलश हे केवळ एक कवी नव्हते, तर शंभूराजांचे विश्वासू सल्लागार आणि मित्र होते, ज्यांनी संकटाच्या काळातही अगदी मरेपर्यंत महाराजांची साथ सोडली नाही. जेव्हा दोघेही मुखरब खान यांच्या सोबत युद्धामध्ये संभाजी राजे सुखरूप तर कवी कलश शत्रूच्या तावडीत सापडल्याची माहिती मिळताच शंभूराजांनी निघून न जाता आपल्या जीवाची पर्वा न करता शत्रूच्या गुहेत आपल्या मित्राला वाचवण्यासाठी पुन्हा गेले आणि म्हणूनच मैत्रीसाठी आजही त्यांचे उदाहरण दिले जात आहे.

एक तरी ओवी अनुभवावी

एक तरी ओवी अनुभवावी' हा संत ज्ञानेश्वरांच्या विचारधारेतील एक महत्त्वाचा संदेश आहे. ज्ञानेश्वरी वाचून त्यातील किमान एका ओवीचा अर्थ समजून, ती आपल्या आचरणात आणा आपल्या समोर जीवनाचा आनंद आणि अनुभव घ्यावा अध्यात्म हे कृती आणि अनुभूतीचे शास्त्र असल्याने आपला उद्धार करू घ्यावा.

# शेतात काम करताना मृत्यू झाला तर थेट मिळणार २५ लाख?; नवे विधेयक चर्चेत

नवी दिल्ली / वृत्तसंस्था

शेतीकाम करताना होणाऱ्या अपघातांमुळे शेतकरी आणि शेतमजुरांचे मोठे नुकसान होत असते. याच पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना आर्थिक सुरक्षा देण्यासाठी भाजपचे राज्यसभा खासदार सतनाम सिंग संधू यांनी संसदेत महत्त्वाचे खासगी विधेयक सादर केले आहे. सध्या सुरू असलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात त्यांनी तीन खासगी विधेयके मांडली असून, त्यामध्ये शेतकऱ्यांसाठी अपघात विमा संरक्षण देणारे विधेयक विशेष महत्त्वाचे मानले जात आहे.

'किसान जीवन सुरक्षा आणि दुर्घटना प्रतिपूर्ती विधेयक, २०२५' या नावाने सादर करण्यात आलेल्या विधेयकाचा मुख्य उद्देश म्हणजे शेतकरी आणि शेतमजुरांना सार्वत्रिक अपघात विम्याचे संरक्षण देणे. या विधेयकानुसार, शेतीकामादरम्यान एखाद्या शेतकऱ्याचा किंवा शेतमजुराचा मृत्यू झाल्यास त्याच्या कुटुंबाला २५ लाख रुपयांची भरपाई देण्याची तरतूद करण्यात आली आहे. तसेच कायमचे अपंगत्व आल्यास १० लाख रुपये आणि अंशतः अपंगत्व आल्यास १ ते २ लाख रुपयांपर्यंत भरपाई मिळणार आहे. ही रक्कम थेट पीडित व्यक्तीला किंवा त्याच्या कुटुंबीयांना दिली जाणार आहे.या विधेयकात सर्व नोंदणीकृत शेतकरी आणि शेतमजुरांसाठी अपघात विमा सक्तीचा असावा, अशी तरतूद करण्यात आली आहे. विमा प्रीमियमसाठी केंद्र सरकार ६० टक्के आणि राज्य सरकारे ४० टक्के खर्च उचलतील, असे संधू यांनी स्पष्ट केले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांवर अतिरिक्त आर्थिक भार येणार नाही, असा दावा त्यांनी केला आहे. सध्या देशातील जवळपास ४६ टक्के लोकसंख्या शेतीवर अवलंबून आहे. मात्र शेती हा व्यवसाय अत्यंत धोकादायक ठरत असून, दरवर्षी शेतीकामादरम्यान १० ते १५ हजार मृत्यू होतात आणि हजारो शेतकरी जखमी होतात. पीक कापणी, कीटकनाशकांची फवारणी, अवजड यंत्रसामग्रीचा वापर, तीव्र उष्णता, पूर अशा अनेक जोखमींना शेतकऱ्यांना सामोरे जावे लागते, असे संधू यांनी सभागृहात नमूद केले.या अपघातांचा परिणाम केवळ जीवितहानीपुरता मर्यादित राहत नाही, तर संबंधित कुटुंबांना गरिबी, कर्जबाजारीपणा आणि सामाजिक असुरक्षिततेला सामोरे जावे लागते. सध्या अस्तित्वात असलेल्या पंतप्रधान पीक विमा योजना आणि पंतप्रधान सुरक्षा विमा योजना या प्रामुख्याने पीक नुकसान किंवा मर्यादित अपघात विम्यावर लक्ष केंद्रित करतात. मात्र शेतीकामाशी संबंधित प्रत्यक्ष जोखमींपासून पूर्ण संरक्षण मिळत नाही, अशी टीका त्यांनी केली आहे.या पार्श्वभूमीवर 'राष्ट्रीय कृषी जोखीम विमा प्राधिकरण' स्थापन करण्याची मागणी या विधेयकात करण्यात आली आहे. ही स्वायत्त आणि वैधानिक संस्था शेतकरी व शेतमजुरांसाठी परवडणारी, व्यापक आणि सक्तीची अपघात विमा योजना राबवेल आणि तिच्यावर देखरेख ठेवेल. या विधेयकामुळे ग्रामीण भागातील सामाजिक सुरक्षेतील मोठी पोकळी भरून निघेल, असा विश्वास संधू यांनी व्यक्त केला आहे.



## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१५०२ : लिस्बन, पोर्तुगाल येथून वास्को-द-गामा भारताच्या दुसर्या सफरीवर निघाला.
१६८९ : आजच्या दिवशी विल्यम आणि मेरी हे इंग्लंड चे राजा राणी बनले.
१९२२ : महात्मा गांधीनी असहयोग आंदोलन वापस घ्यायची घोषणा केली.
१९२८ : गुजरात च्या बारदोली येथे महात्मा गांधी यांनी सत्याग्रह करण्याची घोषणा केली.
१९७६ : पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांच्या हस्ते हडेक्की (केरळ) प्रकल्प देशास अर्पण.
१९९३ : एम. एन. वेंकटचलैय्या यांनी भारताचे २५ वे सरन्यायाधीश म्हणुन कार्यभार सांभाळला.
१९९४ : दोन व्यक्तींनी नॅशनल गॅलरी फोडून त्यातून एडवर्ड मुंक यांची प्रसिद्ध पेंटिंग ''द स्क्रीन'' आजच्या दिवशी चोरी झाली.
१९९९ : बिहार येथे २५ दिवसांसाठी राष्ट्रपती शासन लागू झाले होते.
२००३ : आवाजापेक्षा दुप्पट वेगवान ब्राह्मोस क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी घेण्यात आली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७४२ : बाळाजी जनार्दन भानू उर्फ 'नाना फडणवीस' पेशव्यांच्या दरबारी असणारे मराठा साम्राज्यातील मुत्सद्दी,
१८०४ : हेन्रिक लेन्झ जर्मन भौतिकशास्त्रज (मृत्यू: १० फेब्रुवारी १८६५)
१८०९ : अब्राहम लिंकन अमेरिकेचे १६ वे राष्ट्राध्यक्ष (मृत्यू: १५ एप्रिल १८६५)
१८०९ : चार्ल्स डार्विन उत्क्रांतीवादाचा सिद्धांत मांडणारे ब्रिटिश जीवशास्त्रज्ञ (मृत्यू: १९ एप्रिल १८८२)
१८२४ : मूळशंकर करसनदास तिवारी तथा स्वामी दयानंद सरस्वती संस्कृत विद्वान आणि आर्य समाजाचे संस्थापक (मृत्यू: ३१ आक्टोबर १८८३ अजमेर, राजस्थान)
१८७१ : चार्लस फ्रिअरी तथा दीनबंधू अॅन्ड्र्यूज इंग्लिश मिशनरी, महात्मा गांधींचे जवळचे मित्र, समाजसेवक आणि भारताच्या स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते (मृत्यू: ५ एप्रिल १९४०)
१८७६ : थुब्तेन ग्यात्सो १३ वे दलाई लामा (मृत्यू: १७ डिसेंबर १९३३)
१८७७ : फ्रेंच व्यापारी रेनॉल्ट कंपनीचे संस्थापक लुई रेनॉल्ट यांचा जन्म. (मृत्यू: २४ ऑक्टोबर १९४४)
१८८१ : अॅना पाव्हलोव्हा 'द डाइंग स्वान' म्हणून प्रसिद्ध असलेली रशियन बॅलेरिना (मृत्यू: २३ जानेवारी १९३१)
१९२० : प्राण कृष्ण सिकंद ऊर्फ 'प्राण' चित्रपट अभिनेता (मृत्यू: १२ जुलै २०१३)
१९४९ : गुन्डाप्पा विश्वनाथ शैलीदार फलंदाज
१९५४ : लोकसभेचे माजी सदस्य कीर्ती सोम्या यांचा जन्म.
१९६७ : प्रसिद्ध गायक चित्रवीणा एन रविकिरण यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१७९४ : पेशवाईतील मुत्सद्दी महादजी शिंदे यांचे वानवडी येथे निधन (जन्म: १७३०)
१८०४ : एमॅन्युएल कांट जर्मन तत्त्ववेत्ता (जन्म: २२ एप्रिल १७२४)
१९१९ : दक्षिण भारतातील नवाब सैयद मोहम्मद बहादुर यांचे निधन.
१९८१ : भारतीय चित्रपट दिग्दर्शक शांताराम आठवले यांचे निधन.
१९९८ : पद्मा गोळे कवयित्री (जन्म: १० जुलै १९१३)
२००० : विष्णुअण्णा पाटील सहकार क्षेत्रातील नामवंत नेते (जन्म:)
२००१ : भक्ती बर्वे अभिनेत्री (जन्म: १० सप्टेंबर १९४८)

# लाळ्या खुरकुत रोगास प्रतिकारक लाल सिंधी गाय



भारतात दूध उत्पादनासाठी प्रसिद्ध असलेल्या गायींच्या जातीत लाल सिंधी गायीला विशेष महत्व आहे. मुख्यत: दूध उत्पादनासाठी वापरल्या जाणाऱ्या या गायींची संख्या दिवसेंदिवस कमी होत आहेत.

उगम : या गायीचा उगम पाकिस्तान येथील कराची तसेच भारतातील हैद्राबाद, बिकानेर येथे झाला आहे. सध्या ही गाय हरियाणा, कर्नाटक, केरळ, ओडिशा आणि पंजाब मध्येही मोठ्या प्रमाणात पाळली जाते. यूपी आणि बिहारमधील काही शेतकरी या गायींच्या संगोपनाचे कामही करत आहेत. ऑस्ट्रेलिया, श्रीलंका ब्राझील आणि अमेरिका या देशातही या जाती आढळतात.

शरीर रचना : या जातीच्या गायीचे शरीर गडद ते फिकट लाल रंगाचे असते. त्यांच्या शरीरावर पांढरे पट्टेही दिसतात. लाल सिंधी जातीची गाय मध्यम आकाराची असते. सिंधी गायीचे डोके रूंद, शिंगे लहान व जाड, शेपटी लांब व पाय लहान असतात. या जातीच्या गायीचे सरासरी वजन ३.१५ क्विंटल आणि उंची सुमारे ११५ सें. मी. बैलाचे सरासरी वजन ४.५ क्विंटल आणि उंची सुमारे १३२ सेमी असते.

प्रजोत्पादन आणि उत्पादन : या गायीचा प्रथम माजावर येण्याचा कालावधी हा ३९ ते ५० महिन्याचा असतो. दूध देण्याचा कालावधी २७० दिवस असून सरासरी दूध उत्पादन ११८८ ते १६७५ लिटर आहे. ही गाय एका दिवसात ६ ते ८ लिटर दूध देते.

इतर विशेषता : या गायीचे सरासरी आयुष्य १५ वर्षाचे असते. उष्णता, टिक प्रतिकार, रोग प्रतिकार, उच्च तापमानात प्रजनन इत्यादी सहन करण्याच्या क्षमतेमुळे लाल सिंधी गायी शतकानुशतके वापरली गेली आहे. लाल सिंधी गुरांचे संगोपन प्रामुख्याने भारतात दुग्धशाळेच्या जाती म्हणून केले जाते. पण इतर देशांमध्ये ते मांसासाठी देखील वाढवले जाते. या गायीची थायलेरीयासिस आणि लाळ्या खुरकुत रोगासाठी चांगली रोगप्रतिकारशक्ती असते. बैल शेती व वाहतुकीच्या कामासाठी उपयुक्त असतात. ती आकाराने लहान व बदलत्या हवामानाशी समरस होऊ शकतात.

# पपईच्या दमदार उत्पादनासाठी महत्वपूर्ण टिप्स

अलीकडच्या काळात पारंपारिक शेतीतील धोके वाढले आहेत. अशा स्थितीत फळबागा ही शेतकऱ्यांमध्ये लोकप्रिय आहे. ज्यामध्ये पपईची लागवड हा शेतकऱ्यांसाठी फायदेशीर व्यवहार मानला जातो. पण, पपईची लागवड आणि फायदे यामध्ये आवश्यक खबरदारी घेणे आवश्यक आहे. एकंदरीत हे स्पष्ट आहे की पपईची लागवड करताना आवश्यक ती खबरदारी घेतली नाही तर फायदा कमी आणि हानी होण्याची शक्यता जास्त असते.पपईच्या शेतात पाणी थांबू नये : पपईची लागवड फायदेशीर कशी करावी या विषयावर ज्येष्ठ फळ शास्त्रज्ञ डॉ. एस.के. सिंग सांगतात की, पपई पिकवण्यासाठी आणि उत्पादनासाठी आदर्श तापमान २१ सेंटीग्रेड ते ३६ सेंटीग्रेड असावे. दुसरीकडे, पपईच्या यशस्वी लागवडीसाठी पाण्याचा निचरा होणारी पुरेशी माती असणे आवश्यक आहे, कारण पपईच्या शेतात २४ तासांपेक्षा जास्त पाणी साचल्यास पपई वाचवणे अशक्य आहे. ते पुढे म्हणतात की पपई पिकाला उष्ण हवामानात ओलावा आणि थंड हवामानात कोरड्या निसर्गाच्या जमिनीत चांगली फुले येतात. अत्यंत कमी तापमानाच्या संपर्कात आल्याने पानांचे नुकसान होऊ शकते आणि झाडेही नष्ट होऊ शकतात. पपईसाठी सर्वोत्तम माती ६.० ते ७.० दरम्यान आहे.



रोपवाटिका दोन प्रकारे तयार करता येते : फळ तज्ञ डॉ.एस.के.सिंग यांच्या मते, शेतकरी पपईची रोपवाटिका दोन प्रकारे तयार करू शकतात. ज्यामध्ये एक मार्ग उंच बेड आहे आणि दुसरा मार्ग पॉलिथिन पिशवी आहे. ते पुढे स्पष्ट करतात की, वाढलेल्या बेड पद्धतीने रोपवाटिका वाढवताना, माती चांगली तयार केली जाते आणि योग्य प्रमाणात सर्व शेणखत आणि बिया योग्य अंतर ठेवून पेरल्या जातात. त्याचबरोबर पॉलिथीन पिशव्या पद्धतीने नर्सरी तयार करण्यासाठी पपईच्या बिया पॉलिथिन बॅगमध्ये पेरल्या जातात. यानंतर, ३० ते ४५ दिवसांनंतर, मुख्य भागात रोपे लावता येतात.

रोपे लावताना या गोष्टी लक्षात ठेवा : फळ तज्ज्ञ डॉ.एस.के.सिंग यांच्या रोपवाटिकेत पपईची रोपे तयार झाल्यानंतर त्यांच्या लागवडीसाठी जमीन तयार करावी लागते. त्यासाठी वारंवार नांगरणी करून जमीन चांगली तयार करून १ फूट लांब व १ फूट खोल व १ फूट रुंद खड्डे खणणे आवश्यक आहे. डॉ सिंह यांच्या म्हणण्यानुसार, खोदलेले खड्डे किमान १५ दिवस उन्हात सुकवू द्या, त्यानंतर मुख्य भागात रोपे लावता येतील. खोदलेल्या खड्ड्यातील अर्धा भाग पेरणीपूर्वी किमान १५ दिवस आधी ५ ग्रॅम कार्बोफ्युरान आणि २५-३० ग्रॅम डीएपीने खोदलेल्या मातीने भरता येतो. रोपवाटिकेत तयार केलेली झाडे, माती आणि मुळांसह, झाकण काढून अर्ध्या मातीने भरलेल्या खड्ड्याच्या मध्यभागी ठेवले जाते आणि अर्धे उर्वरित मातीने झाकले जाते. लागवडीनंतर लगेचच हलके पाणी द्यावे. १५ दिवसांपूर्वी खोदलेल्या खड्ड्यात डीएपी टाकता येत नसेल, तर रोप लावताना रासायनिक खत टाकू नये, कारण त्यामुळे मुळांना इजा होऊ शकते.

# पॉलिहाऊसमध्ये केळी लावली तर कमाई दुप्पट?

केळी हे महाराष्ट्रातील अत्यंत महत्त्वाचे आणि मोठ्या प्रमाणावर घेतले जाणारे फळपीक आहे. पारंपरिक पद्धतीने उघड्या शेतात केळीची लागवड अनेक वर्षांपासून केली जात आहे. मात्र सध्याच्या काळात हवामानातील मोठे बदल, अवकाळी पाऊस, वादळी वारे, वाढते तापमान तसेच किडी-रोगांचा प्रादुर्भाव यामुळे केळीच्या उत्पादनावर आणि दर्जावर मोठा परिणाम होत आहे. यामुळे अनेक शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसानही होत आहे. अशा परिस्थितीत पॉलिहाऊस पद्धतीने केळीची लागवड फायदेशीर ठरू शकते का, हा प्रश्न अनेक शेतकऱ्यांच्या मनात निर्माण झाला आहे.






पॉलिहाऊसमध्ये केळीची लागवड : पॉलिहाऊसमध्ये तापमान, आर्द्रता, प्रकाश आणि पाण्याचे नियोजन शेतकऱ्याच्या नियंत्रणात असते. केळीच्या पिकासाठी आवश्यक असलेले अनुकूल वातावरण सतत मिळत असल्यामुळे झाडांची वाढ चांगली होते. उघड्या शेतात वादळी वाऱ्यामुळे झाडे मोडणे, पावसामुळे फळगळ होणे किंवा उन्हामुळे झाडांवर ताण येणे अशा समस्या मोठ्या प्रमाणावर दिसतात. मात्र पॉलिहाऊसमध्ये हे धोके कमी होतात. त्यामुळे उत्पादनात स्थिरता येते आणि दर्जेदार केळी मिळते. पॉलिहाऊसमधील केळी आकाराने एकसारखी, आकर्षक दिसणारी आणि चांगल्या प्रतीची मिळते. अशा केळीला बाजारात चांगला दर मिळतो. विशेषतः टिश्यू कल्चर रोपांचा वापर केल्यास झाडांची वाढ एकसमान होते आणि प्रति झाड उत्पादन वाढते. ठिबक सिंचन आणि फर्टिगेशन पद्धतीमुळे खतांचा योग्य वापर होतो आणि खर्चही कमी होतो. तसेच किडी व रोगांचा प्रादुर्भाव तुलनेने कमी असल्यामुळे कीटकनाशकांवरील खर्चातही बचत होते.

पॉलिहाऊसमध्ये केळीची लागवड, अडचणी : पॉलिहाऊसमध्ये केळीची लागवड करताना काही अडचणीही आहेत. यामधील सर्वात मोठी अडचण म्हणजे सुरुवातीचा खर्च. पॉलिहाऊस उभारणी, स्ट्रक्चर, शेडनेट, ठिबक सिंचन व्यवस्था यासाठी मोठी गुंतवणूक लागते. लहान आणि अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठी हा खर्च परवडणारा नसू शकतो. याशिवाय या पद्धतीसाठी योग्य तांत्रिक ज्ञान, नियोजन आणि नियमित देखरेख आवश्यक असते. पॉलिहाऊसचे कमी खर्चिक, मध्यम आणि उच्च तंत्रज्ञान असे विविध प्रकार असून त्यानुसार खर्चात फरक पडतो. शासकीय अनुदान योजनांचा लाभ घेतल्यास हा खर्च काही प्रमाणात कमी करता येतो. केंद्र व महाराष्ट्र शासनाकडून पॉलिहाऊस उभारणीसाठी ५० टक्क्यांपासून ७५ टक्क्यांपर्यंत अनुदान दिले जाते. काही विशेष योजनांमध्ये हे अनुदान ७५ ते ९० टक्क्यांपर्यंत असू शकते. यासाठी शेतकऱ्यांनी 'महाडीबीटी' पोर्टलवर अर्ज करणे आवश्यक असते.

# आंध्र प्रदेशात रासायनिक खतांच्या वापरात २.२८ टक्के घट

हैद्राबाद / वृत्तसंस्था

आंध्र प्रदेशात २०२४-२५ वर्षात रासायनिक खतांच्या वापरात २.२८ टक्के घट झाली आहे. याबाबतची माहिती आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू यांनी केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान यांना दिली. नायडू यांनी चौहान यांची दिल्लीत भेट घेत राज्याने रासायनिक खतांच्या वापर कमी केल्याचे सांगितले. आंध्र प्रदेशातील शेती आणि त्यांच्याशी संलग्न क्षेत्रांना बळकटी देण्याबाबत मुख्यमंत्र्यांनी नवी दिल्लीतील भेटीत सविस्तर चर्चा केली.



शेतकऱ्यांनी सेंद्रिय आणि नैसर्गिक शेतीकडे वळावे यासाठी राज्य सरकारकडून प्रोत्साहन दिले जात आहे. राज्यातील १८ लाख शेतकऱ्यांनी सुमारे ८ लाख हेक्टर क्षेत्रावर सेंद्रिय शेती करण्यासाठी आधीच संमती दर्शवली असल्याचे मुख्यमंत्री नायडू यांनी नमूद केले. त्यांनी शेतकरी गटांच्या माध्यमातून राबवल्या जाणाऱ्या नैसर्गिक शेती उपक्रमाचा उल्लेख केला. याची व्याप्ती वाढवण्यासाठी पीएम प्रणाम योजनेअंतर्गत निधी उपलब्ध करून देण्याची मागणी त्यांनी केली. त्यांनी केंद्राकडे शेतीत रासायनिक खतांच्या वापर केल्याबद्दल पीएम प्रणाम योजनेला मुदतवाढ देण्याची विनंती केली. तसेच २०२४-२५ या वर्षासाठी २१६ कोटी रुपये निधी देण्याची मागणी केली. नारळ उत्पादक शेतकऱ्यांना पाठिंबा मिळावा यासाठी त्यांनी आंध्र प्रदेशला नारळ लागवडीच्या विकासासाठी २०० कोटी रुपयांचे आर्थिक सहाय्य देण्याची विनंती केली. त्यांनी नारळ प्रक्रिया पार्क, कर्नाटकच्या मॉडेलवर आधारित आधुनिक शहाळ्याच्या नारळाची (टेंडर कोकोनट) बाजारपेठ, प्रगत लागवडीसाठी नारळ उत्पादक शेतकऱ्यांसाठी प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन आणि रोपवाटिकांचा विस्तार करण्याबाबतचा प्रस्ताव मांडला. या उपक्रमांचा नारळ उत्पादक शेतकऱ्यांना मोठा फायदा होईल आणि याचा सुमारे १५ हजार लोकांना रोजगार मिळेल, असे त्यांनी नमूद केले. मुख्यमंत्री नायडू यांनी, केंद्रीय कृषिमंत्र्यांकडे प्रति थेंब अधिक पीक योजनेअंतर्गत प्रलंबित असलेले ६९५ कोटी रुपये जारी करण्याची सूचना केली. त्यांनी दिल्ली भेटीत तोतापुरी आंबा उत्पादकांचा प्रश्न मांडला. २०२५-२६ हंगामासाठी किंमत तफावत भरपाई प्रणाली अंतर्गत केंद्राच्या वाट्याचे १०० कोटी रुपये देण्याची विनंतीही त्यांनी केली.

## मखाना विकास मंडळाच्या स्थापनेची मागणी

राज्य सरकारकडून शेतकऱ्यांना केंद्राच्या वाट्याची रक्कम आधीच देण्यात आली आहे. तोतापुरी आंबा उत्पादक शेतकऱ्यांना घसरलेल्या दराच्या पार्श्वभूमीवर आर्थिक मदत म्हणून केंद्र आणि राज्याचे मिळून एकूण २०० कोटी रुपये वितरित केले आहेत. आंध्र प्रदेशात मखाना विकास मंडळाची स्थापन करण्याची मागणी मुख्यमंत्र्यांनी केली. कोल्लेरू तलाव क्षेत्रातील सुमारे ५० हजार एकर जमीन मखाना लागवडीसाठी योग्य असल्याचे त्यांनी सांगितले. राज्यात माखाना शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी आवश्यक अनुदान आणि पाठबळ देण्याची विनंती त्यांनी केंद्रीय कृषिमंत्र्यांकडे केली.



राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत



# गुणवत्तापूर्ण रस्ते उभारणीसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आवश्यक-आशिमा मित्तल

## काम पूर्ण करणे महत्त्वाचे नसून त्याची गुणवत्ता,टिकाऊपणा गरजेचे

जालना। प्रतिनिधी

नेहमीचा पाऊस, वाढते तापमान, हवामानातील बदल यांचा विचार करून रस्ते बांधकाम करताना आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करणे अत्यावश्यक आहे असे प्रतिपादन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केले. जिल्ह्यात रस्ते बांधकामाच्या गुणवत्तेत सुधारणा व्हावी, तसेच आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर होऊन टिकाऊ व सुरक्षित रस्ते निर्माण व्हावेत, या उद्देशाने ''रस्ते गुणवत्ता निरीक्षण, बांधकाम व नवीन तंत्रज्ञान'' या विषयावर आज दि. १० फेब्रुवारी २०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन भवन येथे भारतीय तंत्रज्ञान संस्था मुंबई येथील प्रा. डॉ. धर्मवीर सिंग यांच्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर भारतीय तंत्रज्ञान संस्था मुंबई येथील प्रा. डॉ. धर्मवीर सिंग, कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक एक श्रीमती स्मिता पवार, कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक दोन व्यंकट मिठेवाड, कार्यकारी अभियंता बांधकाम जिल्हा परिषद जालना श्रीमती सविता सलगर यांची उपस्थिती होती.



यावेळी पुढे बोलतांना जिल्हाधिकारी आशिमा मित्तल म्हणाल्या की, रस्ते हे केवळ दळणवळणाचे साधन नसून जिल्ह्याच्या आर्थिक, सामाजिक व ग्रामीण विकासाचा कणा आहेत. त्यामुळे रस्ते बांधकाम करताना गुणवत्तेशी कोणतीही तडजोड खपवून घेतली जाणार नाही. प्रत्येक रस्ता दीर्घकाळ टिकणारा, सुरक्षित व मानकांनुसार असणे अत्यंत आवश्यक आहे.त्या पुढे म्हणाल्या की, रस्ते बांधकामाच्या प्रत्येक टप्प्यावर आराखडा, मटेरियल निवड, कामाची अंमलबजावणी व अंतिम गुणवत्ता तपासणी यामध्ये काटेकोर निरीक्षण गरजेचे आहे. मुरूम, खडी, डांबर यांची घनता, आर्द्रता, एम.डी.डी. चाचण्या वेळेवर व योग्य पद्धतीने कराव्यात. कार्यशाळेत मार्गदर्शन करतांना भारतीय तंत्रज्ञान संस्था मुंबई येथील प्रा. डॉ. धर्मवीर सिंग म्हणाले की, रस्ते बांधकाम प्रक्रियेत केवळ काम पूर्ण करणे महत्त्वाचे नसून त्याची गुणवत्ता, टिकाऊपणा आणि सुरक्षितता यावर भर देणे गरजेचे आहे. रस्ता तयार करताना मातीची व थरांची घनता , आर्द्रता आणि तपासणी करणे अनिवार्य असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या चाचण्यांमुळे रस्त्याचा पाया मजबूत असून तो दीर्घकाळ टिकणारा आहे की नाही, हे निश्चित करता येते.

गुणवत्ता तपासणीसाठी या आधुनिक उपकरणाचा वापर करावा, असेही त्यांनी सांगितले. या उपकरणाच्या साहाय्याने रस्त्याच्या थरांची मजबुती, भार सहन करण्याची क्षमता व प्रत्यक्ष क्षेत्रात त्वरित मूल्यांकन करता येते. त्यामुळे बांधकामातील त्रुटी सुरुवातीच्या टप्प्यातच लक्षात येऊन आवश्यक सुधारणा करता येतात.बांधकामाच्या प्रत्येक टप्प्यावर नियमित गुणवत्ता तपासणी, तांत्रिक निरीक्षण आणि दस्तऐवजीकरण आवश्यक आहे. यामुळे कामातील पारदर्शकता वाढते तसेच भविष्यातील देखभाल खर्च कमी होतो.यावेळी त्यांनी नवीन बांधकाम तंत्रज्ञान, जसे की सुधारित बिटुमिनस मिक्स, हवामानानुसार डिझाईन केलेले रस्ते, तसेच टिकाऊ व पर्यावरणपूरक साहित्याचा वापर याविषयी सविस्तर माहिती दिली. आधुनिक तंत्रज्ञानाचा योग्य वापर केल्यास रस्त्यांचे आयुष्य वाढते, अपघातांचे प्रमाण कमी होते.

# शेवगाव २ तर पाथर्डीत ७ कॉपीबहाद्दर पकडले




अहिल्यानगर

प्रतिनिधी । अहिल्यानगर बारावीच्या परीक्षेला १० फेब्रुवारीपासून सुरूवात झाली. इंग्रजीचा पहिला पेपर जिल्ह्यातील ११६ परिक्षा केंद्रांवर ६१ हजार ३१९ विद्यार्थ्यांनी दिला. तर १ हजार १४३ विद्यार्थ्यांनी दांडी मारली. दरवर्षीप्रमाणे यंदाही पाथर्डी तालुक्याचीच सर्वाधिक चर्चा झाली. शेवगाव तालुक्यात २ तर पाथर्डीत ७ कॉपीबहाद्दर पकडले. तर पाथर्डीत एका केंद्रावर तब्बल १६ डमी परीक्षार्थी असल्याची तक्रार थेट जिल्हाधिकाऱ्यांकडे करण्यात आल्यानंतर यावरून मोठा संशयकल्लोळ निर्माण झाला. पण रात्री उशिरा डमी उमेदवार नसल्याचे केंद्र संचालकांकडून विभागीय सचिवांना कळवण्यात आले.

अहिल्यानगर । बनावट हॉलतिकीटच्या आधारावर पाथर्डी तालुक्यातील एका केंद्रावर १६ डमी उमेदवार परीक्षा देत असल्याची तक्रार सामाजिक कार्यकर्ते हरिहर गर्जे यांनी थेट जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्याकडे तक्रार केली. त्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी चौकशीचे निर्देश दिले. पहिल्या प्रश्नात वेळ गेला बाकी सोपे प्रश्नपत्रिका सोपी होती, त्यात चुका नव्हत्या. फक्त मुलांना पहिला प्रश्नात, पॅराग्राफ वरून उत्तरे शोधण्यात वेळ गेला. बाकी एकूणच प्रश्नपत्रिका सोपी असल्याने बहुतांश मुले पास होतील. ज्या प्रश्नाला वेळ लागतो तो प्रश्न सोडून ज्या प्रश्नाचे उत्तर येते, ते अगोदर लिहिण्याचे सांगितले होते. ज्या मुलांनी जेमतेम अभ्यास केला असेल, त्यांनी देखील पेपर सोपा गेल्याचे सांगितले. – वैभव चोथे शिक्षक, इंग्रजी, महेश मुनोत विद्यालय. हा तर निव्वळ फार्स हॉलतिकीट तपासणी हा निव्वळ फार्स आहे. बोर्डाने दिलेले हॉलतिकीटांमध्ये छेडछाड करून तो बनावट केल्याची दाट शक्यता आहे. शिक्षण विभागाच्या उदासीनतेमुळे बनावट विद्यार्थी सापडत नाहीत. सीसीटीव्हीची पडताळणी केल्यास सत्य समजेल. – ॲड. हरिहर गर्जे, तक्रारकर्ते. बनावट विद्यार्थी आढळले नाहीत शिक्षण विभागाकडून ३ वेळा तपासणी करण्यात आली. मात्र यात बनावट विद्यार्थी आढळले नाहीत. मात्र यापुढे शिक्षण विभाग हॉल तिकिटासह विद्यार्थ्यांचे आधार कार्ड तपासूनच त्यांना केंद्रात सोडले जाईल. संध्या गायकवाड, शिक्षणाधिकारी.

# स्नेहसंमेलनाच्या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळतो–हनुमंत भोसले



## चाटे स्कूल मध्ये स्नेहसंमेलन उत्साहात

केज । प्रतिनिधी

कै. यशवंतराव चाटे शिक्षण व तांत्रिक प्रशिक्षण संस्था तांबवा संचलित चाटे इंग्लिश स्कूल येथे शैक्षणिक वर्ष २०२५ / २६ या वर्षामधील स्नेहसंमेलन कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला यावेळी या कार्यक्रमाला चाटे इंग्लिश स्कूलचे संस्थापक श्री शिवाजी चाटे सर केज नगरपंचायत च्या प्रथम नागरिक सीताताई बनसोड, डॉक्टर दिनकर राऊत अध्यक्ष आय एम ए, काझी जैनुल आबेदिन सइदोदिन, मा. क्षीरसागर डी बी, सुनील केंद्रे गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती केज, वडवले एल बि इ. मा. बालकल्याण अधिकारी, दिपाली ताई चाटे, गोपीचंद सपाटे दादासाहेब कराड, रमाकांत बापू संस्थापक लक्ष्मी मुंडे नर्सिंग कॉलेज केज, लक्ष्मण बारगजे निरीक्षक इतर मागासवर्गीय कल्याण बीड, दत्तात्रेय चाटे, स्वप्निल उनवणे, ज्येष्ठ नेते किसन दादा कदम, हनुमंत सौदागर, श्री हनुमंत भोसले सर समाजसेवक कविता कराड मॅडम ऍड. मल्हारी आदाटे संभाजीनगर हायकोर्ट, दादासाहेब कराड संस्थापक संत ज्ञानेश्वर गुरुकुल केज, शिवाजी ठोंबरे जिल्हाध्यक्ष छवा संघटना बीड, दिनकर चाटे यांच्यासह माता पालक वर्ग व सर्व पत्रकार बांधव यांच्या उपस्थितीत सर्व बालकलाकारांनी विविध गाण्यावरती सादरीकरण करून सर्वांचे मन जिंकली...

कार्यक्रमाची सुरुवात व उद्घाटन केज नगरपंचायत च्या नगराध्यक्ष शिताताई बनसोड व हनुमंत भोसले सर यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली याप्रसंगी सर्व मान्यवर उपस्थित होते शाळेतील विद्यार्थ्यांनी त्यांच्या परंपरागत वंदनीय अभ्यासगतम सुस्वागतम या गीताने उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले यावेळी बोलताना हनुमंत भोसले सर उपस्थित विद्यार्थी व माता पालक वर्ग यांना संबोधित करताना स्नेहसंमेलना सारख्या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळतो यामधूनच आदर्श कलाकार घडतात जीवनामध्ये कोणतीही गोष्ट अशक्य नसते परंतु ते मिळवण्यासाठी सदैव एक चांगली शाळा व शाळेमध्ये होणारे विविध कार्यक्रम यांच्या माध्यमातून होते. आपण सदैव कार्य मग्न असावे लागते सर्व विद्यार्थ्यांनी चाटे इंग्लिश स्कूल च्या माध्यमातून आपले ध्येय निश्चित करून नोकरी कलाक्षेत्र व्यावसायिक समाजशास्त्र अशा विविध क्षेत्रांमध्ये जाऊन नावलौकिक करावे असे आव्हान स्नेहसंमेलनाच्या कार्यक्रमातून हनुमंत भोसले सर यांनी सांगितले तर अध्यक्षीय समारोपात सीताताई बनसोड यांनी या शाळेचे व सर्व विद्यार्थी शिक्षकांचे तसेच चाटे स्कूलचे संस्थापक शिवाजी चाटे सर यांचे कौतुक करून या शाळेमध्ये खरोखरच केवळ शैक्षणिक गुणवत्ता नव्हे तर विद्यार्थ्यांमध्ये नैतिक मूल्य देखील रुजवले जातात अशा सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करून आपल्या देशाची खरी संस्कृती जोपासली जाते सहभागी विद्यार्थ्यांनी विविध गाण्यावरती भाग घेवून यामध्ये लोकगीत, शेतकरी गीत, कव्वाली, मराठमोळी गाणी, लावण्या, कोळीगीत, देशभक्तीपर गीत, अभंग, लोकनृत्य मराठमोळी लावणी, नृत्य सादर केली शाळेतील सर्व वर्गशिक्षक यांनी मेहनत घेऊन विद्यार्थ्यांना चांगल्या प्रकारे कला सादर करता यावी यासाठी खूप प्रयत्न केले व विद्यार्थ्यांनीही उपस्थित सर्व माता पालक वर्ग यांना आपापल्या कला सादर करून आनंदी केले या स्नेहसंमेलन कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बडे मॅडम यांनी केले तर मान्यवर व पालकांचे चाटे स्कूलच्या वतीने आभार चाटे स्कूलचे संस्थापक शिवाजी चाटे सर यांनी केले

# अंबड प्रमाणे सर्व ठिकाणी अवैध गौण खनिज उत्खनन करणाऱ्यावर कारवाई होणार

## जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षक यांचे कडक निर्देश

जालना। प्रतिनिधी

अंबड तालुक्यात वाळू माफिया वर धडाकेबाज कारवाई करण्यात आल्या तसेच कारवाई इतर तालुक्यात करण्यात येणार आहे अशी माहिती जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षक यांनी दिली आहे. जिल्हात अवैध वाळू व गौण खनिज उत्खनन करणाऱ्या विरोधात महसूल, पोलीस व आर. टी. ओ. विभागाने कठोर कारवाई करावी असे निर्देश जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिले. जिल्ह्यात अवैध गौण खनिज उत्खनन व वाळू चोरीच्या घटनांवर आळा घालण्यासाठी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल व पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल यांनी जालना जिल्ह्यातील सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, पोलीस निरीक्षक, नायब तहसीलदार व मंडळ अधिकारी यांची दूरभाष्य परिषदेद्वारे महत्त्वाची बैठक घेतली.

या बैठकीत जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी महसूल, पोलीस व प्रादेशिक परिवहन विभाग यांनी समन्वयाने काम करून अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतुकीविरोधात तात्काळ व कठोर कारवाई करण्याचे स्पष्ट निर्देश दिले. अवैध वाळू उत्खनन व वाहतूक ही गंभीर बाब असून यावर कोणतीही तडजोड केली जाणार नाही, असे त्यांनी ठामपणे सांगितले.आरटीओ विभागाने अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या वाहनांवर दंडात्मक कारवाई करावी तसेच संबंधित वाहने ब्लॅकलिस्ट करण्याचे आदेश देण्यात आले. यामुळे अशा वाहनांचा पुन्हा वापर होऊ नये, याची खबरदारी घेण्यात येणार आहे.वारंवार अवैध वाळू चोरी करणाऱ्या वाळू माफियांविरोधात कठोर भूमिका घेत एम.पी.डी.ए. कायद्यान्वये कारवाई केली जाणार आहे.अशा कारवाईमुळे अवैध उत्खनन करणाऱ्यांना चाप बसेल, असेही सूचित करण्यात आले. तसेच जिल्ह्यातील प्रमुख टोल नाक्यांवर विशेष पथकांची नियुक्ती करण्याचे निर्देश देण्यात आले. टोल नाक्यांवरील सीसीटीव्ही फुटेज नियमितपणे तपासून अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या वाहनांवर तातडीने कारवाई करण्यात यावी, असेही सांगण्यात आले.या बैठकीत अवैध गौण खनिज उत्खनन रोखण्यासाठी सर्व यंत्रणांनी जबाबदारीने व सक्रियपणे काम करण्याचे निर्देश देत, कोणतीही हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नाही, असा इशारा प्रशासनाच्या वतीने देण्यात आला आहे. अंबड उपविभागात महसूल व पोलीस प्रशासनाने अवैध वाळू उत्खननाबाबत ज्या पद्धतीने संयुक्त कारवाया केल्या आहेत त्याप्रमाणे सर्व तालुक्यात महसूल व पोलीस प्रशासनाने संयुक्त मोहीम राबवावी.

# ब्रह्मगव्हाण उपसा सिंचन योजनेमुळे ५५ गावे टंचाईमुक्त

पैठण

जायकवाडी धरणाचा पाणीसाठा सध्या मुबलक असून या धरणावर असलेल्या ब्रह्मगव्हाण उपसा सिंचन योजनेच्या कालव्यात पाणी सोडल्याने पैठण तालुक्यातील कायमस्वरूपी टंचाईग्रस्त ववा, वडाळासह ५५ गावांना मोठा दिलासा मिळाला आहे. या योजनेमुळे तब्बल १४ हजार हेक्टरहून अधिक क्षेत्र ओलिताखाली आले असून, शेतकऱ्यांना याचा मोठा फायदा होत आहे. ब्रह्मगव्हाण उपसा सिंचन योजनेची इतर कामे वेगाने करण्यावर प्रशासकीय पातळीवर विशेष भर देण्याचे आदेश आमदार विलास भुमरे यांनी दिले आहेत.

आमदार विलास भुमरे यांच्या पाठपुराव्यानंतर या प्रकल्पाला चौथी सुधारित प्रशासकीय मान्यता मागील वर्षी मिळाली. तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंत्रिमंडळ बैठकीत ८९०.६४ कोटी रुपयांच्या निधीस मंजुरी दिली आहे. २००९ मध्ये २२२ कोटी रुपयांची असलेली ही योजना कालांतराने वाढत गेली. पहिल्या टप्प्याचे काम तब्बल नऊ वर्षे सुरू होते. २०१९ पर्यंत प्रकल्प खर्च ७५० कोटींवर ब्रह्मगव्हाण योजना पूर्ण होण्याच्या अगोदर खेर्डासह इतर गावे कायम दुष्काळग्रस्त व टंचाई असणारे होते. आता कामे पूर्ण होत असून राहिलेले कामे मार्गी लागणार आहे. मात्र, सध्या मिळत असलेल्या पाण्यामुळे शेतकरी बागायतदार असून मोसंबीसह इतर फळबागांचे क्षेत्रात वाढ झाली असल्याचे शेती अभ्यासक डॉ. गणेश मोहिते यांनी सांगितले. ''पैठण तालुक्यासाठी ही अत्यंत महत्त्वाची योजना आहे. खेर्डा प्रकल्पामुळे जसा अनेक गावांचा कायापालट झाला, तसाच लाभ या योजनेतूनही होईल. उर्वरित कामे पूर्ण करून आणखी गावांचा समावेश करण्यात येईल, उन्हाळ्यात देखील अधिक क्षेत्र ओलिताखाली आले , असे आ. भुमरे यांनी सांगितले. पोहोचला असून, पहिला व दुसरा टप्पा मिळून आता ८९०.६४ कोटींची प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. पैठण ब्रह्मगव्हाण उपसा सिंचन योजना ऊर्ध्व गोदावरी उपखोऱ्यात असून जायकवाडी प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रात प्रस्तावित आहे. या प्रकल्पामुळे पैठण तालुक्यातील ६५ गावांमधील २० हजार २६५ हेक्टर शेतीला सिंचनाचा लाभ मिळणार आहे. पहिल्या टप्प्यात ५५ गावांचा समावेश करण्यात आला आहे.

जाहिर प्रगटन

## तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड

**दुरध्वनी क्रमांक : ०२४८३-२७५०२६**
**जा..क्र.२०२५/ सेतु/कावि-११४१**
**दिनांक - १५/१०/२०२५**

तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती आसमा हैदरखॉ पठाण रा. अंबड ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या स्वतः जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | आसमा हैदरखॉ पठाण | स्वतः | ०५/०१/१९९४ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक-रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित**
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

# कुकडी चारी दुरुस्तीचे आश्वासन; शेडगावातील रस्ता रोको स्थगित

## येत्या आठ दिवसांत काम सुरु न केल्यास करणार तीव्र आंदोलन

श्रीगोंदे

तालुक्यातील शेडगाव येथील कुकडी कॅनॉल वितरीका क्रमांक १४ चारी दुरुस्तीच्या मागणीसाठी शेडगावचे माजी सरपंच विजय शेंडे यांच्या नेतृत्वात मंगळवारी शेडगाव बसस्थानक परिसरात श्रीगोंदे शेडगाव रस्त्यावर रस्ता रोको आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर कुकडी सिंचन शाखा, आढळगाव येथील शाखाधिकारी थेल्ले यांनी पत्राद्वारे चारी दुरुस्तीबाबत सविस्तर माहिती देत येत्या आठ दिवसांत दुरुस्तीचे काम सुरू करण्यात येईल, असे लेखी आश्वासन दिले. तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाकडून शेडगाव फाट्यापर्यंत रोड दुरुस्तीही आठ दिवसांत सुरू करण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

कुकडी सिंचन शाखेकडून देण्यात आलेल्या माहितीनुसार, वितरीका क्रमांक १४ चारीची कायमस्वरूपी बांधकाम दुरुस्ती महाराष्ट्र सिंचन सुधारणा कार्यक्रमांतर्गत प्रस्तावित असून सदर काम क्षेत्रीय पातळीवर प्रगतीपथावर आहे. मात्र सा.क्र. १४/००० ते १७/००० हा भाग वनविभागाच्या हद्दीत येत असल्याने वनविभागाच्या हरकतीमुळे या टप्प्यातील दुरुस्ती कामास अडथळा निर्माण झाला आहे. तरीही शेतकऱ्यांची गैरसोय लक्षात घेऊन यांत्रिकी विभागामार्फत मशिनरी उपलब्ध करून चारीची तात्पुरती दुरुस्ती व साफसफाई करण्याबाबत वरिष्ठ कार्यालयाशी चर्चा करून तातडीची कार्यवाही करण्यात येणार असल्याचे आश्वासन शाखाधिकारी थेल्ले यांनी दिले. शेडगाव परिसरातील शेतकऱ्यांनी पाणीपुरवठा सुरळीत होण्यासाठी वितरीका क्रमांक १४ चारीची कायमस्वरूपी दुरुस्ती तातडीने पूर्ण क्षमतेने करण्याची मागणी केली आहे. वनविभागाची हरकत दूर करून कामास गती देण्याची अपेक्षा शेतकरी वर्गातून व्यक्त होत आहे. या आंदोलनावेळी तहसील कार्यालयातील अधिकारी मेहेत्रे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी, कुकडी सिंचन विभागाचे अभियंते व पोलीस प्रशासन उपस्थित होते. तसेच आंदोलनास पाठिंबा देण्यासाठी संभाजी ब्रिगेडचे जिल्हा उपाध्यक्ष नाना शिंदे उपस्थित होते. या आंदोलनाचे नेतृत्व माजी सरपंच विजय शेंडे यांनी केले. यावेळी विजय रसाळ, आप्पा शेंडे, वामन भदे, भीमराव बेल्हेकर, सागर गोरे, धनराज भोपळे, तात्या भदे, कांतीलाल गवळी, परशुराम बोबडे, लिंबाजी भदे यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. काम सुरू न केल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा शासनाकडून सकारात्मक भूमिका घेतली जात असल्याने सध्या आंदोलन स्थगित करण्यात आले. दरम्यान, येत्या आठ दिवसांत प्रत्यक्ष काम सुरू न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा ग्रामस्थांनी प्रशासनाला दिला आहे.

# ऑनलाइन फसवणूक टाळण्यासाठी उपाययोजना



जालना। प्रतिनिधी

जिल्हा सूचना विज्ञान केंद्र यांनी 'सेफर इंटरनेट डे' निमित्त जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल भवन, येथे आज इंटरनेटचा सुरक्षित व जबाबदारीने वापर याबाबत जनजागृती करण्यासाठी विशेष कार्यशाळेचे आयोजन केले होते.

इंटरनेटचा सुरक्षित वापर, सायबर सुरक्षा आणि ऑनलाईन फसवणूक टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजना याविषयी तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले.

या कार्यशाळेचा मुख्य उद्देश शासकीय कामकाजात तसेच वैयक्तिक स्तरावर इंटरनेट वापरताना घ्यावयाची काळजी आणि तांत्रिक बाबींबाबत माहिती देणे हा आहे. सर्व शासकीय कार्यालयातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा सूचना विज्ञान केंद्र यांनी केले आहे. या कार्यशाळेस निवासी उपजिल्हाधिकरी शशिकांत हदगल, प्रा. संदीप काळे, जिल्हा सूचना विज्ञान केंद्राचे भूषण लोखंडे, रामेश्वर भोसले, दिपेंद्र जयस्वाल यांच्यासह विविध विभागातील अधिकारी कर्मचारी यांची उपस्थिती होती.

दैनिक
# राज्य लोकतंत्र



## धारूर तहसील कार्यालयासमोर कोथिंबीरवाडी ग्रामस्थांसह किसान सभेचे धरणे आंदोलन

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

**धारूर तालुक्यातील कोथिंबीरवाडी शेतशिवारातील शासकीय जागेवर वास्तव्यास असलेल्या रहिवाशांच्या विविध मागण्यांसाठी अखिल भारतीय किसान सभेच्या वतीने मंगळवार ११ फेब्रुवारी २०२६ पासून धारूर तहसील कार्यालयासमोर बेमुदत धरणे आंदोलन सुरू करण्यात आले आहे.**



कोथिंबीरवाडी शेतशिवारातील रहिवासी गेल्या अनेक वर्षांपासून शासकीय जागेवर वास्तव्यास असून त्याठिकाणी घरकुल बांधकाम केले आहे. मात्र अद्यापही त्यांना मालकी हक्काचे पट्टे (पी.टी.आर.) मिळालेले नाहीत. तसेच पिण्याच्या पाण्याची सोय, वीजपुरवठा, रस्ते, शौचालय यांसारख्या मूलभूत सुविधांचा अभाव आहे. या नागरिकांना तात्काळ न्याय मिळावा, यासाठी हे आंदोलन पुकारण्यात आले आहे.अखिल भारतीय किसान सभेच्या निवेदनानुसार, सन २०१८ च्या शासन निर्णयानुसार ज्या कुटुंबांची नावे लाभार्थी यादीत आहेत, त्यांना तात्काळ मालकी हक्काचे पट्टे देण्यात यावेत. तसेच सन २०१८ च्या सर्व्हेमध्ये ज्यांची नावे वगळण्यात आली आहेत, त्यांची नावे लाभार्थी म्हणून समाविष्ट करण्यात यावीत. सन २०११ पूर्वीच्या नोंदी असलेल्या कुटुंबांनाही पट्टे देण्यात यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे.तसेच शासकीय जागेवर वास्तव्यास असलेल्या सर्व लाभार्थ्यांना प्रधानमंत्री आवास योजनेचा लाभ देण्यात यावा. कोथिंबीरवाडी शेतशिवारातील रहिवाशांना पिण्याच्या पाण्याची तात्काळ सोय करण्यात यावी, अशा प्रमुख मागण्या आंदोलनकर्त्यांकडून करण्यात येत आहेत.

या मागण्यांकडे प्रशासनाने तातडीने लक्ष न दिल्यास आंदोलन तीव्र करण्यात येईल, असा इशाराही अखिल भारतीय किसान सभेच्या वतीने देण्यात आला आहे. आंदोलनात मोठ्या संख्येने ग्रामस्थ, महिला, शेतकरी व कुटुंबीय सहभागी झाले आहेत.

दरम्यान, या आंदोलनाबाबतचे निवेदन धारूर तहसीलदार यांना देण्यात आले असून त्याची प्रत जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, गटविकास अधिकारी व पोलीस निरीक्षक यांनाही पाठविण्यात आले आहेत. यावेळी मनीषा करपे , संजय चोले, एकनाथ ढोरे, गणेश कोथिंबीर ,जयराम खिल्लारे, गणेश ढोरे, मोतीराम गायकवाड, नितीन कोथिंबिरे, बाजीराव कोथिंबिरे, शामराव कोथिंबिरे ,अशोक मुळूक, परमेश्वर कोथिंबीर सह ग्रामस्थ पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## हिवाळ्यातच पाटोद्याचा घसा कोरडा; उन्हाळ्यापूर्वीच पाटोदेकरांना पाण्यासाठी हजारो रुपयांचा फटका!

**पाटोदा । प्रतिनिधी**

उन्हाळ्याची चाहूल लागण्यापूर्वीच पाटोदा शहरात तीव्र पाणीटंचाईचे सावट पसरले असून, ऐन हिवाळ्यात पाटोदेकरांना पाण्यासाठी वणवण भटकण्याची वेळ आली आहे. नगरपंचायतीच्या ढिसाळ नियोजनामुळे सर्वसामान्य नागरिकांना पाण्यासाठी हजारो रुपये मोजून टँकरचा आधार घ्यावा लागत आहे, ज्यामुळे प्रशासनाविरुद्ध तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

नियोजनाचा अभाव, सामान्यांना फटका

पाटोदा शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या यंत्रणेचे नियोजन कोलमडल्याचे चित्र सध्या दिसत आहे. हिवाळ्यात धरणांमध्ये आणि जलस्त्रोतांमध्ये पुरेशा प्रमाणात पाणी उपलब्ध असतानाही,

**प्रशासनाकडून ठोस उपाययोजनेची मागणी**

पाणी ही मूलभूत गरज आहे. त्यामुळे प्रशासनाने आता तरी झोपेतून जागे व्हावे आणि तात्काळ ठोस उपाययोजना करून शहराचा पाणीपुरवठा सुरळीत करावा. अन्यथा, पाण्यासाठी नागरिकांना रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करावे लागेल, असा इशारा स्थानिक रहिवाशांनी दिला आहे.

घराघरात नळांना पाणी येत नसल्याने नागरिक हैराण झाले आहेत. पाण्यासाठी नागरिकांची सकाळपासूनच धावपळ सुरू होत असून, घरगुती वापरासाठी पाणी विकत घेतल्याशिवाय दुसरा पर्याय उरलेला नाही.

महागड्या टँकरचा आधार

शहरातील बहुतांश भागात नळाला पाणी येत नसल्याने खाजगी टँकर चालकांचे फावले आहे. एका टँकरसाठी नागरिकांना ५०० ते १००० रुपयांपर्यंत मोजावे लागत आहेत. ''जर हिवाळ्यात ही परिस्थिती असेल, तर येणाऱ्या भीषण उन्हाळ्यात आमचे काय होणार?'' असा संतप्त सवाल पाटोद्यातील गृहिणी आणि नागरिक विचारत आहेत.

जबाबदार कोण?

नगरपंचायत प्रशासनाने पाणीपुरवठा वितरणाचे योग्य नियोजन न केल्यामुळेच ही कृत्रिम टँकर टंचाई निर्माण झाल्याचा आरोप स्थानिक नागरिक करत आहेत. दुरुस्ती, वितरणाची वेळ आणि पाणी याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याने सामान्य मात्र आर्थिक आणि शारीरिक त्रास सहन करावा लागत आहे.

## नाला प्रकरणावरून धारूर तहसील कार्यालयात दिव्यांग तक्रारदाराचा आत्महत्येचा प्रयत्न

**प्रशासनाच्या आश्वासनानंतर तणाव निवळला; सर्वे नंबर १६५, १६६ मधील नाला काढण्याचे दिले आश्वासन**

किल्ले धारूर । प्रतिनिधी

किल्ले धारूर येथील सर्वे नंबर १६५ आणि १६६ मधील नाला काढण्यासंदर्भात प्रशासनाकडून होत असलेल्या दिरंगाईमुळे संतप्त झालेल्या प्रल्हाद भालेकर या दिव्यांग तक्रारदाराने बुधवारी ११ फेब्रुवारी रोजी सकाळी धारूर तहसील कार्यालयात आत्महत्येचा प्रयत्न केला. या प्रकारामुळे परिसरात खळबळ उडाली होती, मात्र प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करत भालेकर यांना रोखले आणि नाला



काढण्याचे लेखी आश्वासन दिल्यानंतर पुढील अनर्थ टळला.

मिळालेल्या माहितीनुसार, किल्ले धारूर येथील सर्वे नंबर १६५ आणि १६६ मधून वाहणारा नैसर्गिक नाला अडवला गेल्याने किंवा त्यात अतिक्रमण झाल्याने तक्रारदार प्रल्हाद भालेकर मागील अनेक दिवसां पासून प्रशासनाकडे दाद मागत होते. मात्र, तहसील प्रशासन याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप भालेकर यांनी केला आहे. प्रशासकीय दिरंगाई आणि कामात होत असलेली चालढकल यामुळे त्रस्त होऊन त्यांनी टोकाचे पाऊल उचलण्याचे ठरवले.

तहसील कार्यालयात धावपळ अडाली तक्रारदार भालेकर यांनी तहसील कार्यालय गाठले ◂◂ पान ३ वर

## राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाच्या मंडप व संपर्क कार्यालयाचे अभय धोंडे यांच्या हस्ते उद्घाटन

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी येथे आयोजित डॉ. स्वामीनाथन राज्यस्तरीय कृषी प्रदर्शन दि. १९ ते २३ फेब्रुवारी दरम्यान मोठ्या उत्साहात संपन्न होत आहे.या कृषी प्रदर्शनाच्या मंडप व संपर्क कार्यालयाचे उद्घाटन युवा नेते अभय धोंडे यांच्या हस्ते करण्यात आले.उद्घाटन प्रसंगी शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाचे सर्व प्रशासन अधिकारी,कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य,प्राध्यापक विविध मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आष्टी कृषी महाविद्यालय हे सतत कृषी प्रदर्शन भरणारे महाराष्ट्रातील पहिले कृषी महाविद्यालय असे डॉ.डी.बी. राऊत यावेळी प्रशासन अधिकारी







डॉ.डी.बी.राऊत यांनी आपल्या मनोगतात सांगितले की,आष्टी कृषी महाविद्यालय हे सातत्याने राज्यस्तरीय कृषी प्रदर्शन भरविणारे महाराष्ट्रातील पहिले कृषी महाविद्यालय आहे.शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी आणि शेतीच्या सर्वांगीण विकासासाठी हे प्रदर्शन अत्यंत उपयुक्त ठरत आहे. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव, संशोधनाची दिशा आणि शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती देण्याचे कार्य या माध्यमातून प्रभावीपणे होत आहे असे त्यांनी नमूद केले.

त्यांनी पुढे सांगितले की,या प्रदर्शनामुळे शेतकरी व विद्यार्थी यांच्यात थेट संवाद निर्माण होतो आणि आधुनिक शेती तंत्रज्ञान गावागावात पोहोचते.धोंडे

यांच्या दूरदृष्टीमुळे आणि शेतकरी हिताच्या विचारातून हा उपक्रम ◂◂ पान ३ वर

## कर्जतच्या आदर्श पत्रकार संघ पुरस्कार कार्यक्रमाला उपस्थित रहा

**साळुंके, मुडेगावकर, सुतार,अरबुने, हंगे यांचे आवाहन**



बीड । प्रतिनिधी

मराठी अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्या पत्र महर्षी रंगा आण्णा वैद्य आदर्श जिल्हा व वसंतराव काणे आदर्श तालुका पुरस्कार वितरण कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन बीड जिल्हाध्यक्ष विशाल साळुंके, कार्याध्यक्ष गजानन मुडेगावकर, सरचिटणीस सुभाष सुतार, कोषाध्यक्ष धनंजय अरबुने, प्रसिद्धी प्रमुख संजय हंगे यांनी केले आहे.

अखिल भारतीय मराठी ◂◂ पान ३ वर

## महापशुधन एक्सपोला शेतकऱ्यांनी बहुसंख्येने उपस्थित राहावे-डॉ.तांदळे

बीड । प्रतिनिधी

पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांच्या पुढाकाराने परळी येथे दि. १३ ते १५ फेब्रुवारीपर्यंत महा पशुधन एक्सपो प्रदर्शनाच्या माध्यमातून बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना व पशुपालकांसाठी संधी ठरणार आहे. अखिल भारतीय पातळीवरील पशुप्रदर्शन परळीत व्हावे असा ठराव सेवानिवृत्त पशुवैद्यकीय कर्मचाऱ्यांच्या राज्यस्तरीय मेळाव्यात दि. २० ऑगस्ट २०२५ रोजी परळी येथील श्रद्धा मंगल कार्यालयात सर्व मताने ठराव पास करून या मागणीचे निवेदन मुख्यमंत्री, पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे, पशुसंवर्धन आयुक्त पुणे यांना तहसीलदार मार्फत पाठवलेल्या निवेदनाद्वारे केली होती. नंतर काही दिवसांनी छत्रपती संभाजीनगर येथील विमानतळावर पंकजाताई मुंडे यांना प्रत्यक्ष भेटून डॉ. वसंत मुंडे, डॉ. संजय तांदळे आदींनी मागणीचे निवेदन दिले होते. निवेदनाची दखल घेऊन मागणीला यश आले असून परळी येथे पशुधन एक्सपो प्रदर्शन होत आहे. या प्रदर्शना प्रदर्शनात १५०० विविध जातीचे पशु प्रदर्शित केले जाणार आहेत. डॉग शोसह प्राण्यांसाठी ४० प्रकारच्या स्पर्धा होणार आहेत. विजेत्यांना पारितोषिक दिली जातील. कृषी महिला व बालविकास ◂◂ पान ३ वर

## धनगर जवळका येथे घनकचरा व्यवस्थापनाच्या कामावर आक्षेप; काम तात्काळ थांबवण्याची मागणी

**पाटोदा । प्रतिनिधी**

**तालुक्यातील धनगर जवळका ग्रामपंचायत अंतर्गत सुरू असलेल्या घनकचरा व्यवस्थापन योजनेच्या कामावर ग्रामस्थांनी तीव्र आक्षेप घेतला असून, हे काम निकृष्ट दर्जाचे व अंदाजपत्रकाच्या विरुद्ध पद्धतीने सुरू असल्याचा आरोप करण्यात आला आहे. संबंधित काम तात्काळ थांबवून चौकशी करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.**

यासंदर्भात प्रकाश पोपट खाडे (रा. धनगर जवळका, ता. पाटोदा, जि. बीड) यांनी गटविकास अधिकारी, पंचायत समिती पाटोदा यांना लेखी निवेदन दिले आहे. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, संबंधित ठेकेदाराने कामाचे अंदाजपत्रक व कामाची माहिती दर्शवणारा फलक लावलेला नाही. तसेच घनकचरा साठवणुकीची व्यवस्था मारुती मंदिराशेजारी करण्यात येत असून त्यामुळे ग्रामस्थांच्या धार्मिक भावना दुखावल्या जात आहेत.

काम हे अधिकृत अंदाजपत्रकानुसार न होता ठेकेदाराच्या मनमानी पद्धतीने सुरू असल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे. त्यामुळे या प्रकरणाची सखोल चौकशी करून निकृष्ट व बोगस काम तात्काळ थांबवावे तसेच संबंधित ठेकेदारावर योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, या निवेदनाच्या प्रती मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री बीड, जिल्हाधिकारी बीड, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हापरिषद बीड व ग्रामसेवक, ग्रामपंचायत धनगर जवळका यांनाही पाठविण्यात आल्याची माहिती अर्जदारांनी दिली. या प्रकरणाकडे प्रशासनाने तातडीने लक्ष देण्याची अपेक्षा ग्रामस्थांकडून व्यक्त केली जात आहे.

## आयएसओ जि.प. केंद्रीय प्राथमिक शाळा जामगावच्या नव्या प्रवेशद्वार कमानीचे थाटात अनावरण

आष्टी । प्रतिनिधी

जामगाव येथील आयएसओ मानांकन प्राप्त जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेच्या नव्याने सुशोभित करण्यात आलेल्या प्रवेशद्वार कमानीचा अनावरण सोहळा सरपंच तथा युवा नेतृत्व मा. राधेश्याम (भैय्या) धस व जामगाव ग्रामस्थांच्या शुभहस्ते उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या कार्यक्रमामुळे शाळेच्या सौंदर्यात भर पडली असून ग्रामस्थांमध्ये समाधानाची भावना व्यक्त होत आहे.

या अनावरण सोहळ्याप्रसंगी दादा शिंदे, उपसरपंच बिभीषण (आण्णा) धस, माजी सरपंच राजेंद्र सातपुते, वसंत (आप्पा) धस साहेब,



ग्रामविकास अधिकारी शिवाजीराव औंदकर, संभाजी भांगे, ग्रामपंचायत सदस्य सुखदेव सोनटक्के, बिभीषण सोनटक्के, विठ्ठल झांबरे, अभंग (तात्या) धस, किरण सातपुते, सुनील धस, सतीश शिंदे, गणेश शिंदे, बापूराव माने, सेवानिवृत्त फौजी नवनाथ रणसिंग यांच्यासह अनेक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जामगावचे कर्तव्यदक्ष व कार्यतत्पर युवा सरपंच मा. राधेश्याम (भैय्या) धस यांच्या विशेष सहकार्यामुळे शाळेच्या प्रवेशद्वार कमानीचे सुबक, आकर्षक व दर्जेदार सुशोभीकरण करण्यात आले आहे. या कमानीमुळे शाळेची ओळख अधिक उठावदार झाली असून विद्यार्थ्यांमध्येही शाळेबद्दल आपुलकी आणि अभिमानाची भावना निर्माण होत आहे. शाळेतील शैक्षणिक वातावरण अधिक सक्षम व सुरक्षित व्हावे यासाठी विविध सोयीसुविधांवर विशेष लक्ष देण्यात आले आहे. विद्यार्थ्यांसाठी आवश्यक फर्निचर, इन्व्हर्टर व बॅटऱ्या, शाळा स्वच्छतेसाठी कचराकुंड्या, शाळा परिसरात हायमॅक्स लाईट बसविण्यात आले आहेत. तसेच विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या ◂◂ पान ३ वर

## शहरातील मुलींच्या छेडछाड प्रकरणी कडक कारवाई करा

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील शाळा, महाविद्यालये व कोचिंग क्लासेस परिसरात वाढत्या छेडछाड घटनांच्या पार्श्वभूमीवर भाजपचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर, नगरसेविका डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांची मंगळवारी (दि. १०) भेट घेऊन विविध मागण्या मांडल्या. शहरातील सुरक्षा व्यवस्थेला अधिक बळकटी देण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याची मागणी यावेळी करण्यात आली.

शहरातील शाळा, महाविद्यालये व कोचिंग क्लासेसच्या बाहेर सध्या मुलींच्या छेडछाडीच्या घटना वाढत



भाजपचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर, नगरसेविका डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांचे एसपींना निवेदन

असल्याची बाब पोलीस प्रशासनाच्या निदर्शनास आणून देण्यात आली. काही ठिकाणी अशा प्रवृत्तीचे लोक एकत्र येऊन वातावरण बिघडविण्याचा प्रयत्न करत असल्याचेही सांगण्यात आले. या प्रकारांना आळा घालण्यासाठी संबंधितांवर कडक कारवाई करण्याची मागणी करण्यात आली.

तसेच शाळा, महाविद्यालये आणि कोचिंग क्लासेस परिसरात दामिनी (चिडीमार) पथकाच्या माध्यमातून सातत्याने पेट्रोलिंग करून संशयित हालचालींवर लक्ष ठेवण्याची आवश्यकता व्यक्त करण्यात आली. याशिवाय शहरातील अनेक पोलीस चौक्या सध्या बंद अवस्थेत असल्याने त्या तातडीने सुरू करून तेथे आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून द्यावे, अशी मागणीही डॉ.क्षीरसागर यांनी केली. यासंदर्भात पोलीस अधीक्षकांशी सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी युवा नेते राणा चव्हाण, भाजप विद्यार्थी आघाडीचे जिल्हाध्यक्ष संग्राम बांगर यांच्यासह भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## सौताडा-जामखेड घाटात अपघातांची मालिका सुरूच

**उसाचा ट्रॅक्टर उलटल्याने संताप, प्रशासनाच्या नाकर्तेपणाविरोधात आंदोलनाचा पवित्रा**

पाटोदा । प्रतिनिधी

सौताडा-जामखेड घाटातील मृत्यूचा सापळा आता प्रवाशांच्या जीवावर उठला आहे. गेल्या अनेक वर्षांपासून संथ गतीने सुरू असलेल्या रस्ते कामामुळे आज पुन्हा एकदा उसाने भरलेला ट्रॅक्टर घाटात उलटून भीषण अपघात झाला. सुदैवाने यात प्राणहानी टळली असली, तरी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दिरंगाईमुळे स्थानिक नागरिक आणि वाहनधारकांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे.

कासवगतीने काम अन् अपघातांचे सत्र

सौताडा घाटातील रस्त्याचे काम गेल्या अनेक वर्षांपासून रखडलेले आहे. कामाचा



दर्जा आणि गती या दोन्ही बाबतीत प्रशासन सपशेल अपयशी ठरल्याचे दिसत आहे. रस्त्यावर ठिकठिकाणी पडलेले खड्डे, अर्धवट राहिलेले सिमेंटिकरण आणि धोकादायक वळणांमुळे हा मार्ग वाहन चालकांसाठी कर्दनकाळ ठरत आहे. काही दिवसांपूर्वीच याच घाटात एक सिमेंटचा टँकर पलटी झाला होता, आणि आज उसाच्या ट्रॅक्टरचा अपघात झाला. या सततच्या अपघातांमुळे प्रशासन अजून किती बळींची वाट पाहत आहे? असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत.

प्रशासनाचे 'अर्थपूर्ण' दुर्लक्ष?

रस्त्याच्या दुरवस्थेबाबत वारंवार तक्रारी करूनही सार्वजनिक ◂◂ पान ३ वर

## आष्टीच्या प्रथम घोडकेची अवघ्या २४ व्या वर्षी कृषी उपसंचालक (वर्ग-१) पदी निवड

आष्टी । प्रतिनिधी

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत () घेण्यात आलेल्या स्पर्धा परीक्षेत आष्टी येथील नगरसेवक बाळासाहेब घोडके यांचे चिरंजीव प्रथमेश (प्रथम) बाळासाहेब घोडके यांनी दैदिप्यमान यश संपादन करत कृषी उपसंचालक (वर्ग-१) पदावर झेप घेतली आहे. अवघ्या २४ व्या वर्षी मिळवलेल्या या यशामुळे आष्टी तालुक्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला असून, सर्व स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



प्रथमेश यांनी आपले प्राथमिक व माध्यमिक शिक्षण आष्टी येथील पंडित नेहरू विद्यालयातून पूर्ण केले. त्यानंतर कोल्हापूर येथील राजर्षी शाहू कृषी महाविद्यालयातून कृषी पदवी संपादन केली. सध्या राहुरी येथे एमएससीचे शिक्षण घेत असताना त्यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या वर्ग-१ पदासाठीच्या परीक्षेत पहिल्याच प्रयत्नात यश मिळवत आपली गुणवत्ता सिद्ध केली. ग्रामीण भागातून पुढे येत स्पर्धा परीक्षेत यश संपादन करणे ही सोपी बाब नसताना प्रथमेश यांनी सातत्य, मेहनत आणि स्पष्ट ध्येय यांच्या जोरावर हे यश मिळवले. शेती आणि शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी प्रशासकीय सेवेत जाण्याचे स्वप्न त्यांनी उराशी बाळगले होते. कृषी क्षेत्राची निवड करून त्यांनी समाजोपयोगी कार्याचा मार्ग स्वीकारला आहे. या यशाबद्दल आनंद व्यक्त करताना नगरसेवक बाळासाहेब घोडकेम्हणाले, ''प्रथमेशने जिद्द, चिकाटी आणि परिश्रम यांच्या बळावर हे यश संपादन केले आहे. समाजसेवेचा जो वारसा आम्ही जपला, तोच वारसा तो आता प्रशासकीय अधिकारी म्हणून पुढे नेईल, याचा आम्हाला अभिमान आहे.'' ◂◂ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# धनकवडीत अवैध हुक्का पार्लरवर छापा; पाच जण ताब्यात

**पुणे । प्रतिनिधी**

उच्चभ्रू सोसायटीत थाटलेल्या हुक्का पार्लरवर सहकारनगर पोलिसांनी कारवाई करून पाच जणांना ताब्यात घेतले. यावेळी हुक्का पॉट व साहित्य, तसेच विविध प्रकारच्या हुक्का फ्लेवर्सनी भरलेले चिलीम असा १२ हजार ४९५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. धनकवडीतील श्री गुरुनानक कृपा इमारतीच्या तिसऱ्या मजल्याच्या टेरेसवर हे हुक्का पार्लर सुरू होते.

राजनसिंग भजनसिंग गोरोवाडा (वय ३५, रा. राजमुद्रा सोसायटी, धनकवडी), पारस परमानंद शर्मा (वय २४), सुभाष मानसिंग गिरी (वय २०), तिलक भोला तिवारी (वय ३५), नारायण मेघे आचार्य (वय ३४, रा. सर्व मूळ नेपाळ, सध्या गुरुनानक कृपा बिल्डिंग, राजमुद्रा सोसायटी) अशी ताब्यात घेण्यात आलेल्यांची नावे



आहेत. याप्रकरणी, आरोपींच्या विरुद्ध सहकारनगर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, राजसिंग याच्या मालकीची धनकवडीतील राजमुद्रा सोसायटीत गुरुनानक कृपा नावाची बिल्डिंग आहे. तेथे तो मुलांचे खासगी वसतिगृह (पिजी) चालवितो. त्याच इमारतीच्या टेरेसवर त्याने हे हुक्का पार्लर थाटले होते.


दरम्यान, पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी अवैध हुक्का पार्लरवर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. त्या पार्श्वभूमीवर सहकारनगर पोलिसांचे पथक हद्दीत गस्त घालत होते. त्यावेळी पोलिस हवालदार अमोल पवार यांना माहिती मिळाली की, धनकवडी येथील राजमुद्रा सोसायटीतील मेहेर लिव्हिंग बिल्डिंगशेजारील श्री गुरुनानक कृपा बिल्डिंगच्या तिसऱ्या मजल्याच्या टेरेसवर अवैध हुक्का पार्लर सुरू आहे. त्यानुसार पोलिस उपायुक्त मिलिंद मोहिते, वरिष्ठ पोलिस निरीक्षक विठ्ठल पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक गणेश कर्चे, कर्मचारी नीलेश शिवतरे, किरण कांबळे, बजरंग पवार, महेश भगत, अमोल पवार यांच्या पथकाने बिल्डिंगमध्ये छापा टाकला. पोलिसांनी दरवाजा तोडून आत प्रवेश केला. त्यावेळी चार टेबलांवर आठ व्यक्ती हुक्कासेवन करताना दिसून आले. काऊंटरवर असलेल्या व्यक्तीकडे चौकशी केली असता, त्याने सर्व माहिती पोलिसांना दिली. हुक्का पार्लर चालविणारा मालक आणि कामगार अशा पाच जणांना पोलिसांनी ताब्यात घेतले. तसेच हुक्क्याचे साहित्य देखील जप्त केले. शहरात हुक्का पार्लरवर पोलिसांनी यापूर्वी देखील मोठी कारवाई केली आहे.

# विमानतळ भूसंपादन प्रक्रिया १ जूनपर्यंत करण्याचे आदेश; मंत्री मुरलीधर मोहोळांची माहिती

**पुणे । प्रतिनिधी**

पुरंदर येथील आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाला राज्य शासनाने मान्यता दिल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीनंतर केली. या प्रकल्पासाठी आवश्यक जमीन अधिग्रहण प्रक्रिया १ जून २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे दिले आहेत.

पुणे व पश्चिम महाराष्ट्राच्या दृष्टीने हा अत्यंत महत्त्वाचा निर्णय असल्याचे सांगत केंद्रीय नागरी उड्डाण राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी या निर्णयाचे स्वागत केले आहे. मोहोळ म्हणाले की, वाढती एअर कनेक्टिव्हिटी ही उद्योग, व्यवसाय, आयटी क्षेत्र, पर्यटन, तसेच कृषी निर्यातीसाठी निर्णायक ठरणार आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळानंतर पुरंदर विमानतळ हा पुणे आणि पश्चिम महाराष्ट्रासाठी मोठा पर्याय उपलब्ध होणार असून, वाढत्या प्रवासी व





मालवाहतूक क्षमतेला मोठी चालना मिळणार आहे.


आंतरराष्ट्रीय कनेक्टिव्हिटीच्या दृष्टीने मध्य पूर्व, युरोप, दक्षिण-पूर्व आशिया आदी महत्त्वाच्या जागतिक मार्गांशी थेट हवाई संपर्क प्रस्थापित होण्यास मदत होईल. ज्यामुळे निर्यात, परकीय गुंतवणूक आणि जागतिक व्यवसाय संधींना नवी दालने खुली होतील. पुरंदर विमानतळामुळे लॉजिस्टिक्स, वेअरहाउसिंग, एमएसएमई उद्योग, तसेच कृषी उत्पादनांच्या जलद वाहतुकीला गती मिळून शेतकऱ्यांनाही थेट बाजारपेठ उपलब्ध होणार आहे. रोजगारनिर्मिती, पायाभूत सुविधा विकास आणि गुंतवणूक वाढीसाठी हा प्रकल्प महत्त्वाचा ठरेल, असा विश्वासही मोहोळ यांनी व्यक्त केला. राज्य व केंद्र शासनाच्या समन्वयातून पुरंदर विमानतळ प्रकल्प वेळेत पूर्ण करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील, असेही मोहोळ यांनी स्पष्ट केले.

# बुधवार पेठेत पोलिसांचं कोम्बिंग ऑपरेशन!

## ७०० जणांची झाडाझडती अन् अल्पवयीन मुलींची सुटका

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातील बुधवार पेठेत (झींपिश ईींवहुरी झशींह) बुधवारी मध्यरात्री १२ ते पहाटे ३ वाजेपर्यंत पुणे पोलिसांनी कोम्बिंग ऑपरेशन केलं आणि तब्बल ४१ बिल्डिंगची झाडाझडती घेतली. यामध्ये ७०० जणांची चौकशी करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली. तसेच या कारवाईत दोन बांगलादेशी महिला तसेच काही अल्पवयीन मुलींची सुटका करण्यात यश आलं. झडती घेतलेल्या काही जणांकडून ७ ग्रॅम चरस तसेच अमली पदार्थांचे इंजेक्शन जप्त करण्यात आलं आहे. हे अमली पदार्थ आणि इंजेक्शन नेमकं कुठून



आणले गेले होते, याचे पेडलर कोण आहेत याचा तपास पोलिसांकडून सुरू आहे.

वेश्यावस्तीत बेकायदा वास्तव्य करणाऱ्या एका बांगलादेशी तरुणीवर कारवाई न करणाऱ्या महिला पोलीस कर्मचाऱ्याला निलंबित केल्यानंतर पोलिसांनी ही मोठी मोहीम हाती घेतली. बुधवार पेठेत येणाऱ्या आणि जाणाऱ्या सर्व रस्त्यावर पोलिसांनी नाकाबंदी केली. शुक्रवार पेठ पोलीस चौकी जवळ असलेल्या सर्व कुंटणखान्यातील महिलांची महिला पोलिसांनी चौकशी केली. तसेच या ठिकाणी वावरत असलेल्या अनेक तरुणांची पोलिसांनी झाडाझडती घेतली. अंमली पदार्थ तसेच जबरदस्तीने वेश्याव्यवसाय करायला भाग पाडणे, बांगलादेशी महिलांचे बेकायदा वास्तव्य या अनुषंगाने पोलिसांनी अनेक संशयितांची चौकशी केली. या ऑपरेशन मध्ये ६०० पेक्षा अधिक पोलीस अधिकारी कर्मचारी सहभागी होते. मध्यरात्री १२ वाजता सुरू झालेल्या या कोम्बिंग ऑपरेशनमध्ये बुधवार पेठेतील ४१ बिल्डिंग तपासल्या, गेल्या तसेच ७०० लोकांची झडती घेण्यात आल्याची माहिती पुणे पोलिसांनी पत्रकार परिषदेतून दिली. स्थानिक पोलिसांसह गुन्हे शाखेच्या विविध युनिटचे पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा मोठा फौजफाटा रात्री १२ वाजता बुधवार पेठेत दाखल झाला. बुधवार पेठेत येणारे आणि जाणारे सर्व रस्ते नाकाबंदी करून पोलिसांनी बंद केले आणि त्यानंतर ही कारवाई करण्यात आली.

# पुण्यात भाजपचं कठोर पाऊल, ६९ बंडखोर सहा वर्षांसाठी निलंबित, अमोल बालवडकरांसह बड्या नेत्यांचा समावेश

**पुणे । प्रतिनिधी**

राज्यात नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकीमध्ये अनेक घडामोडी घडल्या, अनेक उमेदवारांनी पक्षाने उमेदवारी न दिल्याने अधिकृत उमेदवारांच्या विरोधात आपला अर्ज दाखव केला, आता पक्षाच्या अधिकृत उमेदवारांविरोधात निवडणूक लढवणाऱ्या बंडखोरांवर भाजपने कठोर कारवाई करत शहरातील ६९ कार्यकर्त्यांना सहा वर्षांसाठी निलंबित केले आहे. प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या आदेशानुसार ही कारवाई करण्यात आली असून, नुकत्याच पार पडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांनंतर हा निर्णय जाहीर करण्यात आला.(झींपिश इगझ)

भाजपच्या अधिकृत उमेदवारांविरोधात अपक्ष किंवा इतर पक्षांच्या माध्यमातून निवडणूक लढवणाऱ्या कार्यकर्त्यांवर पक्षशिस्तीचा भंग केल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे. संबंधितांना पक्षातून सहा वर्षांसाठी दूर ठेवण्यात येणार असून, या कालावधीत त्यांना कोणतीही संघटनात्मक जबाबदारी किंवा पद दिले जाणार नाही, असे स्पष्ट करण्यात आले आहे. पक्षशिस्त भंग करणाऱ्यांबाबत कोणतीही सहानुभूती




दाखवली जाणार नाही, असा ठाम संदेश पक्षाने दिला आहे. भविष्यातही कुठल्याही पदाधिकारी किंवा कार्यकर्त्याने पक्षविरोधी भूमिका घेतल्यास त्यांच्यावर कठोर कारवाई केली जाईल, अशी सूचना शहराध्यक्षांनी केली आहे. या निर्णयामुळे स्थानिक राजकारणात खळबळ उडाली असून, आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भाजपने संघटनात्मक शिस्त अधिक मजबूत करण्याचा प्रयत्न सुरू केल्याचे मानले जात आहे.(झींपिश इगझ) याबाबातचे पत्र देखील समोर आले असून पत्रावरती सर्व ६९ जणांची नावे असून त्यावरती भाजप प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांची सही आहे, या पत्रामध्ये लिहलंय की, भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष श्री, रविंद्रजी चव्हाण साहेब यांच्या आदेशानुसार भारतीय जनता पार्टीच्या विरोधात निवडणूक लढविलेल्या कार्यकर्त्यांचे पुढील सहा वर्षाकरिता पार्टीमधून निलंबन करण्यात आले आहे. पक्षशिस्त भंग करणाऱ्यांबाबत कोणतीही सहानुभूती न दाखवण्याचा निर्धार पक्षाने स्पष्ट केला आहे. दरम्यान, पक्षातील कुठल्याही पदाधिकारी किंवा कार्यकर्त्याने पक्षविरोधी भूमिका घेतल्यास त्यांच्यावरही कठोर कारवाई केली जाईल, असे सूचनाही जिल्हाध्यक्षांनी केल्या आहेत.

# अजित पवारांच्या स्मारकावरुन जय पवार-पार्थ पवारांमध्ये मतभिन्नता ?

**पुणे । प्रतिनिधी**

राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे २८ जानेवारीला बारामती येथे विमान अपघातामध्ये निधन झाले होते. यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस आणि पवार कुटुंबाला मोठा धक्का बसला होता. अजित पवार (-क्षळीं झरुरी) यांच्या निधनानंतर बारामती येथील विद्या प्रतिष्ठानमध्ये त्यांचे स्मारक उभारण्याची चर्चा सुरु झाली होती. काही दिवसांपूर्वीच विद्या प्रतिष्ठानमध्ये या विषयाबाबत शरद पवार, पार्थ पवार आणि जय पवार (गरू झरुरी) यांची एक बैठक पार पडली होती. मात्र, या सगळ्या घडामोडी सुरु असताना आता अजित पवार यांच्या स्मारकाबाबत पार्थ पवार (झरींह झरुरी) आणि जय पवार या दोघांमध्ये मतभिन्नता असल्याचे समोर आले आहे. अजित पवार यांचं स्मारक किंवा संग्रहालय कुठे



उभारायचे यावरुन जय पवार आणि पार्थ पवार यांची वेगळी मतं आहेत. (चरहरीरिहींर झेश्रळींळली छशुी)

जय पवार यांचा अजित पवार यांचं संग्रहालय पुण्यात करा आणि स्मारक बारामतीत असावं असा आग्रह आहेत. तर पार्थ पवार यांच्याकडून वेगळी भूमिका मांडण्यात आली आहे. पार्थ पवार हे अजित पवारांचे संग्रहालय आणि स्मारक हे दोन्ही एकाच ठिकाणी म्हणजे बारामतीत उभारण्याबाबत ठाम आहेत. परंतु, अजित पवार यांचे पुणे जिल्हा आणि पुणे शहर यावर प्रचंड प्रेम होते. त्यामुळे अजित पवार यांचे संग्रहालय पुणे शहरात असावे, असे जय पवार यांचे म्हणणे आहे. मंगळवारी जय पवार यांनी मंत्रालयातील सुनेत्रा पवार यांच्या दालनात पक्षाच्या काही पदाधिकाऱ्यांसमोर भूमिका मांडत आपली इच्छा बोलून दाखवली. त्यामुळे आता सुनेत्रा पवार आणि इतर पवार कुटुंबीय याबाबत काय निर्णय घेणार, हे बघावे लागेल.



# स्वारगेट मेट्रो हबला अजित पवारांचे नाव द्या-रोहन सुरवसे पाटील यांची मागणी

**पुणे । प्रतिनिधी**

स्वारगेट येथे उभारण्यात येत असलेल्या मल्टी हब मेट्रो स्टेशनला महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे माजी पालकमंत्री दिवंगत अजितदादा पवार यांचे नाव देण्यात यावे, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते रोहन सुरवसे पाटील यांनी केली आहे.

यासंदर्भात पुणे मेट्रो रेल प्रकल्पाचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांना राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते रोहन सुरवसे पाटील यांनी निवेदन दिले आहे. दरम्यान, याप्रसंगी हर्डीकर यांनी यासंदर्भात प्रशासकीय पातळीवर योग्य निर्णय घेतला जाणार असल्याचे आश्वासन दिले आहे. स्वारगेट हे पुणे शहरातील महत्त्वाचे वाहतूक केंद्र असून बसस्थानक, मेट्रो सेवा आणि इतर प्रवासी सुविधांचा एकत्रित संगम येथे होणार आहे. त्यामुळे हे ठिकाण 'मल्टी मॉडेल ट्रान्सपोर्ट हब' म्हणून विकसित होत आहे.

अशा महत्त्वाच्या ठिकाणाशी दिवंगत अजित पवार यांचे नाव जोडणे ही त्यांच्या कार्याला योग्य आदरांजली ठरेल, असेही सुरवसे यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

# शेअर मार्केट गुंतवणुकीतून २२ कोटींना फसवले, पुण्यात ८५ वर्षीय वृद्धास मोठ्या परताव्याचे आमिष

**पुणे । प्रतिनिधी**

शेअर मार्केटच्या नावाने पैशांचे आमिष दाखवून अनेकांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक केल्याच्या घटना सातत्याने समोर येत आहेत. दिवसेंदिवस सायबर (ूलशी लीळाश) गुन्ह्यांमध्ये वाढ होताना दिसत असून नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. त्यातच, आता पुण्यात (झींपिश) आतापर्यंतचा सर्वात मोठा सायबर फसवणुकीचा प्रकार उघडकीस आला आहे. ८५ वर्षीय ज्येष्ठ नागरिकाला तब्बल २२ कोटी रुपयांचा गंडा घालण्यात आल्याने शेअर बाजार गुंतवणुकांमध्ये खळबळ उडाली आहे. शेअर मार्केटमध्ये (डहरीश ारीज्ञशीं) मोठा नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवत, आकर्षक आणि हमखास परताव्याचे आश्वासन संबंधितांकडून देण्यात आले होते. या आमिषाला बळी पडून संबंधित ज्येष्ठ नागरिकांनी तब्बल २२ कोटी रुपयांची गुंतवणूक केली.



शेअर बाजारातील गुंतवणुकीतून नफा मिळवून देण्याच्या नावाखाली आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच गुंतवणूकदाराने तात्काळ सायबर पोलिसांकडे धाव घेतली. या प्रकरणात पुणे पोलिसांनी छत्रपती संभाजीनगरमधून जवळपास आठ जणांना अटक केली आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपींच्या खात्यांवर वेळोवेळी अशाच प्रकारे इतर लोकांचे पैसे फिरवण्यात आल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. या सायबर चोरट्यांनी आणखी किती जणांची फसवणूक केली आहे, याचा सखोल तपास सध्या पुणे पोलीस करत आहेत. मात्र, या घटनेमुळे पुन्हा एकदा शेअर मार्केटमधील मोठ्या परताव्याचे आमिष दाखवून केली जाणारी फसवणूक चर्चेत आली आहे. नागरिकांनी शेअर मार्केटच्या नावाने आमिष दाखवणाऱ्यांच्या भूल थापांना बळी न पडण्याचे आवाहन पोलिसांकडून करण्यात आलं आहे.

# ओतूरमध्ये भरदिवसा बिबट्याचा हल्ला; तरुण शेतकरी गंभीर जखमी

**ओतूर । प्रतिनिधी**

जुन्नर तालुक्यातील ओतूर हद्दीत आवळी शिवारात भरदिवसा बिबट्याने हल्ला करून एका तरुण शेतकऱ्यास गंभीर जखमी केले. यामुळे अवघा ओतूर परिसर हादरून गेला आहे. धनंजय नारायण डुंबरे (वय ३१) असे जखमी शेतकऱ्याचे नाव असून, ही घटना विजय त्र्यंबक घोलप यांच्या शेतात बुधवारी (दि. ११) दुपारी १ वाजता घडली.

मिळालेल्या माहितीनुसार, धनंजय डुंबरे हे दुपारी १ वाजेच्या सुमारास कांद्याच्या पिकाला पाणी भरत होते. त्यावेळी अचानक दबा धरून बसलेल्या बिबट्याने त्यांच्यावर झडप घातली. अनपेक्षित हल्ल्यामुळे धनंजय गंभीर जखमी झाले. त्यांच्या हात-पाय व पोटावर जखमा झाल्याचे समजते. त्यांच्या आरडाओरडीनंतर शेजारील शेतकरी व ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेतली. लोकांचा आवाज व गोंधळ ऐकून बिबट्याने शेतातून पळ काढला. जखमी धनंजय डुंबरे यांना तातडीने ओतूर येथील ग्रामीण रुग्णालयात हलविण्यात आले. प्राथमिक उपचारानंतर पुढील उपचारासाठी त्यांना नारायणगाव येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आल्याची माहिती वनकर्मचारी विश्वनाथ बेले यांनी दिली आहे. जखमी डुंबरे यांची प्रकृती स्थिर असल्याचे वैद्यकीय



सूत्रांनी सांगितले. घटनेची माहिती मिळताच वनविभागाचे ओतूर वनपरिक्षेत्र अधिकारी चैतन्य कांबळे व कर्मचारी विश्वनाथ बेले, सारिका बुट्टे घटनास्थळी तात्काळ दाखल झाले. परिसरात बिबट्याचा वावर वाढल्याच्या तक्रारी यापूर्वीही ग्रामस्थांनी केल्या होत्या; मात्र प्रत्यक्ष भरदिवसा झालेल्या या हल्ल्यामुळे शेतकरी व नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

ग्रामस्थांनी वनविभागाकडे तातडीने पिंजरा लावून बिबट्याला जेरबंद करण्याची मागणी केली आहे. तसेच शेतात काम करणाऱ्या शेतकऱ्यांच्या सुरक्षेसाठी गस्त वाढवावी, अशी मागणीही करण्यात येत आहे. दरम्यान, या घटनेमुळे ओतूर व परिसरातील शेतकरी धास्तावले असून, दिवसा देखील शेतात जाण्यास भीती वाटत असल्याची भावना व्यक्त केली जात आहे. वनविभागाने तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात, अन्यथा आंदोलनाचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

# पावसाळापूर्व कामे ३० एप्रिलपर्यंत पुर्ण करावीत; महापौरांचे प्रशासनाला आदेश

**पुणे । प्रतिनिधी**

आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर पुणे शहरातील संभाव्य पूरस्थिती, नालेसफाई आणि मुळा-मुठा नदी सुधार प्रकल्पाचा तातडीने आढावा घेण्याचे आदेश महापौरांनी महापालिका प्रशासनाला दिले आहेत. नागरिकांची सुरक्षा आणि मूलभूत सुविधा हे सर्वोच्च प्राधान्य असून कोणतीही दिरंगाई खपवून घेतली जाणार नाही, असा स्पष्ट इशाराही देण्यात आला आहे.

याबाबतचे पत्र महापौर मंजुषा नागपूरे यांनी महापालिका आयुक्तांना दिले आहे. त्यानुसार पुढील आढावा बैठक घेतली जाणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. तसेच शहरातील नाले सफाईसह पावसाळी वाहिन्यांची सफाईही येत्या ३० एप्रिलपर्यंत पूर्ण करून या कामांची दैनंदिन नोंद क्षेत्रीय कार्यालय स्तरावर ठेवून त्याचा अहवाल



महापौर कार्यालयास सादर करण्याचे निर्देशही या पत्रात देण्यात आले आहेत. महापौरांनी दिलेल्या पत्रानुसार, गेल्या काही वर्षांतील अतिवृष्टीचा अनुभव लक्षात घेता, नदीकाठच्या वस्त्या आणि पूरप्रवण भागांतील धोका अधिक असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

प्रशासनाने अशा भागांची 'हॉटस्पॉट्स' यादी अद्ययावत करून पाणी साचू नये यासाठी पंपिंग मशिनरी आणि अन्य आवश्यक उपाययोजना तातडीने सज्ज ठेवणे आवश्यक आहे. अशा पूरप्रवण भागांची आपण स्वत: पाहणी करणार असून संबंधित विभागप्रमुखांनी यावेळी उपस्थित राहावे, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. मुळा-मुठा नदी सुधार प्रकल्पाच्या सध्याच्या प्रगतीचा आणि पावसाळ्यातील सुरक्षेचा सविस्तर अहवाल तीन दिवसांत महापौर कार्यालयात सादर करण्याचे निर्देश प्रशासनाला देण्यात आले आहे. तसेच पावसाळ्यात रस्ते निसरडे होऊन अपघात होऊ नयेत यासाठी नवीन खोदकामास परवानगी देण्याची अंतिम तारीख निश्चित करावी. सध्या सुरू असलेली कामे तातडीने पूर्ण करून रस्ते तातडीनं दुरूस्त करावेत अशा सूचनाही या पत्रात करण्यात आल्या आहेत. या कामांना प्रशासनाने प्राधान्य देण्याचे आदेशही त्यांनी दिले आहेत.

# हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रोसाठी महिला ट्रेन पायलट

**पिंपरी । प्रतिनिधी**

पुणे शहरातील तिसरा मेट्रो मार्ग म्हणजेच माण, हिंजवडी ते शिवाजनीगर (पिंक लाईन) ही मेट्रो सेवा प्रत्यक्षात मार्गावर धावण्यासाठी संबंधित कंपनीचे प्रयत्न सुरु आहेत. या मेट्रोचे स्टेअरिंग महिलांच्या हातात देण्यात येणार आहे. अभियंता असलेल्या तरुणींना मेट्रोचे सारथ्य करण्यासाठी त्यांचे प्रशिक्षण देखील पूर्ण झाले आहे. पहिल्या टप्प्यात शंभर महिला ट्रेन पायलटची नेमणूक केली असून, पुणे आयटी सिटी मेट्रो रेल लिमिटेडने या प्रकल्पाच्या संचलन आणि देखभाल करणार आहे.



सार्वजनिक-खाजगी भागीदारीतून आकाराला येत असलेल्या या प्रकल्पात टाटा आणि सीमेन्स यांसारख्या कंपन्यांचा सहभाग आहे. मात्र, केवळ महिलांच्या हाती संचलनाची धुरा सोपवण्याचा हा निर्णय जागतिक रेल्वे क्षेत्रात 'अद्वितीय उपक्रम' म्हणून ओळखला जाणार आहे. या ट्रेन पायलट महिलांच्या निवडीसोबतच त्यांच्या सुरक्षिततेसाठी विशेष 'प्रोटोकॉल' तयार करण्यात आले आहेत. कामाच्या ठिकाणापासून ते प्रवासापर्यंतच्या सुरक्षिततेची जबाबदारी ही कंपनी घेणार आहे. हा प्रकल्प केवळ वाहतुकीचे साधन नसून तो महिला सक्षमीकरणाचे जागतिक प्रतीक ठरेल, असा विश्वास 'पीएमआरडीए'ने व्यक्त केला. दरम्यान, हा मार्ग मार्च २०२६ मध्ये सुरु करण्यासाठी संबंधित कंपनीकडून प्रयत्न सुरु आहेत. तांत्रिक आणि सिग्नलचे काम झाले आहे. त्यानुसार या कामाचे प्रशिक्षण संबंधित महिलांना देण्यात येत आहे. तसेच, या कामाची माहिती व कामाचे स्वरुप समजून सांगण्यात येत आहे. त्यामुळे आता मेट्रोची सुरुवात झाल्यानंतर त्याबाबतचे सर्व नियंत्रण हे या महिलांचे असणार आहे.